मेरा पानी उतरता देख मेरे किनारे पर घर मत बसा लेना मैं समंदर हूँ लौटकर वापस आऊँगा !!!

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२८० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि.४ डिसेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## भाजपा विधिमंडळ नेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची एकमताने निवड



### देवेंद्र फडणवीसांचा उद्याला मुख्यमंत्री पदाचा होणार ग्रैंड शपथविधि

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मुंबई**

भाजपाच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची निवड करण्यात आली आहे. पक्ष निरीक्षक म्हणून राज्यात आलेले गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या उपस्थितीत भाजपा विधिमंडळ आमदारांची बैठक पार पडली. या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं असून महाराष्ट्राचे पुढील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच असतील हे अखेर ठरलं आहे. भाजपा विधिमंडळाच्या बैठकीनंतर महायुतीचे नेते आज दुपारी राज्यपालांकडे जाऊन सत्तास्थापनेचा दावा करण्यात आला.

सकाळी ११ वाजता विधान भवनाच्या सेंट्रल हॉलमध्ये भाजपा विधिमंडळ आमदारांची बैठक होती. या बैठकीत भाजपाचे १३२ आमदार त्याशिवाय भाजपाला पाठिंबा दिलेले ५ इतर आमदारही उपस्थित होते. बैठकीपूर्वी भाजपा नेते, आमदारांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. या बैठकीसाठी विधानभवन फुलांनी सजवलं होते. त्याशिवाय भाजपा आमदारांनी भगवे फेटे घातले होते. या बैठकीला सुरुवात होण्याआधी नेत्यांनी पक्षाचे निरीक्षक निर्मला सीतारामन आणि विजय रुपाणी यांचे स्वागत केले. बैठकीआधी भाजपा कोअर कमिटीची बैठक पार पडली. यात प्रस्ताव कोण मांडणार, सूचक, अनुमोदक कोण असणार हे ठरवण्यात आलं. तोपर्यंत भाजपा आमदार सेंट्रल हॉलमध्ये जमले होते. कोअर कमिटीच्या बैठकीनंतर सगळे नेते सेंट्रल हॉलमध्ये पोहचले.

या बैठकीत भाजपाचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत पाटील आणि सुधीर मुनगंटीवार यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला. त्याला पंकजा मुंडे, प्रविण दरेकर, रवींद्र चव्हाण, संजय कुटे, संजय सावकारे, अशोक उइके, आशिष शेलार, योगेश सागर, गोपीचंद पडळकर यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर या प्रस्तावाला भाजपाच्या सर्व आमदारांनी एकमताने मंजुरी दिली.

**आजचा दिवस ऐतिहासिक – बावनकुळे**

आजचा दिवस आपल्यासाठी ऐतिहासिक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात हा विजय मिळवला. राज्यात डबल इंजिन सरकार महाराष्ट्राला पुढे नेऊ शकतं. जनतेने आपल्याला भरभरून यश दिले. प्रचंड विश्वास आपल्यावर टाकला. महायुतीचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राष्ट्रवादीचे अजित पवारांसह महायुती नेत्यांनी एकत्रित निवडणूक लढवली. राज्यातील १४ कोटी जनतेचे आभार मानले पाहिजे. जनतेने भाजपा आणि महायुतीवर विश्वास टाकला. आपण १४९ जागा भाजपा म्हणून लढवल्या. त्यात आतापर्यंतच्या भाजपाच्या इतिहासात १३२ जागा विजयी झाल्या. आपल्याला इतर अपक्ष आमदारांनी पाठिंबा दिला. महायुतीचं संख्याबळ २३७ आहे तर भाजपाचं संख्याबळ १३२ आणि ५ इतर धरून १३७ इतके संख्याबळ आहे. राज्याचे यशस्वी नेतृत्व देवेंद्र फडणवीस यांनी केले. हे यश फार मोठे आहे अशी प्रतिक्रिया भाजपा प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी बैठकीत दिली.

## 'एक है तो सेफ है', 'मोदी है तो मुमकीन है' देवेंद्र फडणवीस यांनी मानले भाजपचे आभार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मुंबई**

देवेंद्र फडणवीस यांची बुधवारी भाजप विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड करण्यात आली. यावेळी बोलताना फडणवीस यांनी आपली निवड केल्याबद्दल पक्षाचे आभार मानले. तसेच महाराष्ट्राला विकासाच्या एका नव्या उंचीवर नेण्याचा निर्धारही व्यक्त केला. विशेषतः यावेळी त्यांनी यंदाची निवडणूक अत्यंत ऐतिहासिक ठरल्याचे नमूद करत 'एक है तो सेफ है', 'मोदी है तो मुमकीन है'चा नाराही दिला.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, भाजप विधिमंडळ पक्षनेतेपदी एकमताने निवड केल्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो. ही निवड प्रक्रिया करण्यासाठी आलेले केंद्रीय निरीक्षक विजय रुपाणी व निर्मला सीतारामन यांचेही मी आभार मानतो. विशेषतः या संपूर्ण प्रक्रियेत आमच्यासोबत असणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेही मी आभार मानतो. आपल्याला सर्वांना याची कल्पना आहे की, यावेळची निवडणूक अत्यंत ऐतिहासिक ठरली. या निवडणुकीचे विश्लेषण करायचे झाले तर, तर मी असे म्हणेन की, या निवडणुकीने एक गोष्ट आपल्यापुढे निश्चितपणे ठेवली आहे, ती म्हणजे एक है तो सेफ है आणि मोदी है तो मुमकीन है.

लोकसभा निवडणुकीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात पुन्हा एकदा देशात विजयाची मालिका सुरू झाली. महाराष्ट्राच्या जनतेला माझा साष्टांग दंडवत. त्यांनी खूप मोठा जनादेश आम्हाला दिला. यंदाचे वर्ष अतिशय महत्त्वाचे आहे. आपण सर्वजण ज्या प्रक्रियेतून निवडून येतो, त्या संविधानाला यंदा ७५ वर्ष पूर्ण होत आहेत. त्यामुळे अत्यंत महत्त्वाच्या वर्षात आज आपण सरकार स्थापन करत आहोत.

महाराष्ट्राच्या जनतेने महायुतीवर अत्यंत महत्त्वाची जबाबदारी सोपवली. आम्हाला प्रचंड मोठा जनादेश दिला. या जनादेशाचा आनंद आहेच, पण यामुळे आपली जबाबदारीही तेवढीच वाढली आहे. एका मोठ्या जबाबदारीची जाणीव करून देणारा जनादेश जनतेने आम्हाला दिला आहे. विशेषतः आपल्या लाडक्या बहिणी असतील, लाडके भाऊ असतील, शेतकरी किंवा तरुण असतील या सर्वांनी आणि



समाजातील दलित, वंचित, ओबीसी, आदिवासी सर्वांनी दिलेल्या जनादेशाचा सन्मान राखण्याचे काम आपल्याला करावे लागणार आहे.म्हणून आपली प्राथमिकता ही आपण सुरू केलेल्या योजना आणि आपण दिलेली आश्वासने पूर्ण करण्याला असेल. तसेच महाराष्ट्राला पुढे नेण्यासाठी, महाराष्ट्राला सर्व आघाड्यांवर प्रथम क्रमांकावर आणण्यासाठी आपल्या सर्वांना सातत्याने कार्यरत राहायचे आहे.

**२०१९ मध्ये आम्हाला मिळालेला कौल हिसकावून घेण्यात आला**

देवेंद्र फडणवीस म्हणाले, २०१९ मध्येही जनतेचा कौल आपल्याला मिळाला होता. पण दुर्दैवाने जनतेचा कौल हिसकावून घेण्यात आला. त्यावेळी जनतेसोबत बेईमानी झाली. माझी त्या इतिहासात जाण्याची इच्छा नाही. आपण एक नवी सुरूवात करत आहोत. पण एका गोष्टीचा निश्चित उल्लेख करेन, की सुरुवातीच्या अडीच वर्षात ज्या प्रकारे वेगवेगळ्या पद्धतीने आपल्याला त्रास देण्यात आला, आपल्या आमदारांना त्रास देण्यात आला, नेत्यांना त्रास देण्यात आला. त्यानंतरही एकही आमदार आपल्याला सोडून गेला नाही. सर्व आमदार, सर्व नेते संघर्ष करत होते. त्या संघर्षामुळेच २०२२ मध्ये पुन्हा आपले सरकार आले. त्यातूनच आज पुन्हा एकदा स्पष्ट बहुमताने महायुतीचे सरकार आले. हे एक अभूतपूर्व यश आहे.

माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला राज्याच्या सर्वोच्च पदाची ३ वेळा संधी दिल्याबद्दल मी पंतप्रधान मोदींचे आभार मानतो. हा पक्ष ज्या प्रकारे त्यांच्या नेतृत्वात मोठा झाला, त्यातूनच सामान्य कार्यकर्त्यांना वेगवेगळी पदे मिळाली. काम करण्याची संधी मिळाली.

**काही गोष्टी मनासारख्या काही गोष्टी मनाविरोधात होतील**

देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी आपल्या सहकाऱ्यांना भविष्यातील काही गोष्टींचीही जाणिव करून दिली. ते म्हणाले, आपल्याला जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी मोठा संघर्ष करावा लाणार आहे. आपल्याला जनतेच्या अपेक्षा पूर्ण करायच्या आहेत. हे करताना आपल्याला महायुतीमधील सर्वांना सोबत घेऊन पुढे जावे लागेल. काहीवेळा सर्वांच्या अपेक्षा पूर्ण होत नाहीत. पण आपण एक मोठा विचार घेऊन राजकारणात आलो आहोत हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे.

भविष्यात काही गोष्टी आपल्या मनासारख्या होतील व काही गोष्टी मनाविरोधात होतील. पण त्यानंतरही आपण सर्वजण एकदिलाने काम करू. आपली शक्ती दाखवून देऊ. मी राज्यातील जनतेला आश्वस्त करू इच्छितो की, आमचे सराकर महाराष्ट्राच्या सर्वांगिन विकासासाठी, प्रगतीसाठी २४ तास काम करेल व सामान्य माणसांच्या आशा आकांक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करेल, असेही देवेंद्र फडणवीस यावेळी बोलताना म्हणाले.

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिल्यात देवेंद्र फडणवीस यांना शुभेच्छा

### आपल्या नेतृत्वाखाली राज्याच्या विकासाला गती मिळेल असा विश्वास केला व्यक्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४नागपूर**

भारतीय जनता पक्षाचे गट नेतेपदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांचे नाव निश्चित होताच शहरासह विदर्भातील विविध जिल्ह्यात जल्लोष केला जात असताना अनेक मान्यवरांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी देवेंद्र फडणवीस यांची विधीमंडळाच्या नेतेपदी निवड होताच त्यांचे ट्विटरच्या माध्यमातून हार्दिक अभिनंदन केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मागदर्शनाखाली आणि आपल्या नेतृत्वाखाली राज्याच्या विकासाला गती मिळेल असा विश्वास व्यक्त करत गडकरी यांनी देवेंद्र फडणवीस यांना शुभेच्छा दिल्या.



भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते आनंदराव ठवरे यांनी देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करत त्यांच्या कार्यकाळात राज्यात विकासाला गती येईल यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. गंगाधरराव फडणवीस यांच्यासोबत भाजपच्या कार्यालयात येणारा देवेंद्र फडणवीस राज्याचा पुन्हा मुख्यमंत्री होत असल्यामुळे आम्हाला जास्त आनंद आहे. संघाचा स्वयंसेवक, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भारतीय जनता युवा मोर्चा, नगरसेवक, महापौर, आमदार , मुख्यमंत्री अशी सर्व कारकीर्द त्यांची बघितली आहे. त्यामुळे त्यांच्या मुख्यमंत्री निवडीचा आनंद असल्याचे ठवरे म्हणालेत.

**५ वर्षांनी ते पुन्हा आले!**

देवेंद्र फडणवीस हे राज्यात तिसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. २०१४ साली फडणवीसांनी पहिल्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली होती. मुंबईच्या वानखेडे मैदानावर हा भव्यदिव्य सोहळा पार पडला होता. २०१४ ते २०१९ सलग ५ वर्ष मुख्यमंत्रिपद सांभाळणारे देवेंद्र फडणवीस हे राज्याचे दुसरे मुख्यमंत्री ठरले होते. २०१९ च्या निवडणुकीत महायुतीने प्रचंड बहुमत मिळवले मात्र उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदासाठी काँग्रेस–राष्ट्रवादीशी आघाडी केली. त्या राजकीय घडामोडीत अजित पवारांनासोबत घेत देवेंद्र फडणवीस यांनी दुसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली होती. परंतु अवघ्या ७२ तासांत त्यांना मुख्यमंत्रिपदावरून पायउतार व्हावे लागले. २०१९ मध्ये फडणवीसांनी निवडणूक प्रचारात मी पुन्हा येईन, याच भूमिकेत, याच निर्धाराने अशी घोषणा केली होती. मात्र उद्धव ठाकरे यांच्या खेळीमुळे फडणवीसांना विरोधी पक्षनेतेपदी बसावं लागले. त्यानंतरच्या काळात विरोधकांनी मी पुन्हा येईन घोषणेवरून फडणवीसांची खिल्ली उडवली परंतु आज ५ वर्षांनी पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री म्हणून पुढे आले आहेत.

## एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्रीपद घेणार की नाही? सस्पेन्स कायम

### देवेंद्र फडणवीस यांच्या विधानाने चर्चांना उधाण : मी तर शपथ घेणार – अजित पवार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मुंबई**

महाराष्ट्राच्या राजकारणातील सस्पेन्स अजून पूर्णपणे संपलेला नाही. महायुतीच्या नेत्यांनी आज राजभवनात जावून महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेतली. यावेळी महायुतीच्या नेत्यांनी राज्यपालांना पत्र देत सरकार स्थापनेचा दावा केला. भाजपचे गटनेते देवेंद्र फडणवीस, शिवसेनेचे गटनेते एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते अजित पवार या तीनही दिग्गज नेत्यांनी एकत्रितपणे राज्यपालांची भेट घेऊन सरकार स्थापनेचा दावा केला. यानंतर राज्यपालांनी महायुतीच्या तीनही नेत्यांना नव्या सरकारच्या शपथविधीसाठी वेळ दिला. या घडामोडींनंतर देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि एकनाथ शिंदे या तीनही नेत्यांची संयुक्त पत्रकार परिषद पार पडली.

यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे यांच्याबाबत केलेल्या एका वक्तव्याने शिंदे महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात सहभागी राहणार की नाही? याबाबतचा मोठा सस्पेन्स निर्माण झाला आहे.मात्र अजित पवार यांनी मि तर शपथ घेणार अस वक्तव्य पत्रकार परिषदेत केले.



एकनाथ शिंदे यांना मंत्रिमंडळात राहावं अशी विनंती केली. त्यांच्या आमदारांचीही तीच विनंती आहे. त्यांचा आम्हाला सकारात्मक प्रतिसाद मिळेल अशी आशा आहे, असं मोठं वक्तव्य देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे मंत्रिमंडळात राहणार की नाही? याबाबतचा मोठा सस्पेन्स निर्माण झाला आहे. तिघांची शपथ होईल. आणखी कोणाचा होणार हे आज संध्याकाळपर्यंत निर्णय घेऊ. कोण कोण शपथ घेणार याची माहिती संध्याकाळी देईल. गेल्या अडीच वर्षात आम्ही तिघांनी मिळून निर्णय घेतले आहे. पद ही तांत्रिक गोष्ट आहे. पण आम्ही यापुढेही तिघे मिळूनच निर्णय घेणार आहोत. राज्याला विकासाच्या मार्गावर नेणावर आहोत. जे आश्वासन दिले ते पूर्ण करण्यावर आमचा भर असेल, असंही देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केलं.मी विशेष आभार मानतो आमच्या शिवसेनेचे अध्यक्ष राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे की, त्यांनी शिवसेनेच्या वतीने माझ्या समर्थ पत्र दिलं, महायुतीचा मुख्यमंत्री म्हणून मला करावं, असं पत्र राज्यपालांना दिलं. राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार यांनी देखील त्याच आशयाचं पत्र देवून, मला मुख्यमंत्री म्हणून शपथ द्यावी, अशी विनंती केली आहे. सर्व मित्रपक्षांनी अशीच विनंती केली आहे, असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

## संपादकीय ......

# हेल्मेट सक्ती करा, पण आधी रस्ते नीट करा

राज्य पोलिसांनी हेल्मेटबाबत पुन्हा एकवार कडक भूमिका घेण्याचा निर्धार केलेला दिसत आहे. दुचाकी वाहनावर बसणाऱ्या चालकाला व त्यापाठीमागे बसणाऱ्या प्रवाशाला हेल्मेट सक्तीचे निर्देश दिले आहेत. हेल्मेट सक्ती ही दुचाकीस्वाराच्या जीवितासाठी अत्यावश्यक बाब असली तरी या निर्देशाची अंमलबजावणी करण्याआधी पोलिसांनी सर्वच बाबींचा सखोल विचार करणे आवश्यक होते. मुळातच मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक अशा सर्वच शहरामध्ये आता घरटी दुचाकीचे प्रमाण वाढू लागले आहे. काही घरांमध्ये दोन ते तीन दुचाकीही पाहावयास मिळू लागल्या आहेत. घरामध्ये पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिलाही दुचाकी चालवू लागल्याने दुचाकीच्या मार्केटमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. लोकांच्या उत्पन्नात वाढ झाल्याने भौतिक सुखाच्या संकल्पना बळावल्या आहेत. सार्वजनिक प्रवासी सुविधा पुरवणाऱ्या वाहनांकडे कानाडोळा करत स्वमालकीच्या दुचाकी तसेच चारचाकी वाहनातून प्रवास करण्याकडे आता अनेकांचा कल वाढू लागला आहे.

चारचाकी वाहनेदेखील सेंकडहॅण्डमध्ये दीड-दोन लाखांमध्ये उपलब्ध होऊ लागल्याने घरोघरी दुचाकी पाठोपाठ चारचाकी वाहने मोठ्या संख्येने दिमाखात उभी राहू लागली आहेत. दुचाकी व चारचाकी वाहनांच्या विक्रीचा आलेख गगनभरारी घेत असला तरी रस्त्यांची संख्या वाढली का? रस्त्यावरील खड्ड्यांची संख्या कमी झाली का? पदपथावरून फेरीवाल्यांचे पूर्णपणे उच्चाटन होऊन पादचाऱ्यांना ये-जा करण्यासाठी पदपथ मोकळे झाले का? वाहनांच्या वाढत्या संख्येच्या तुलनेत या वाहतूक व्यवस्थेला नियंत्रित करण्यासाठी वाहतूक पोलिसांच्या संख्येत वाढ झाली का? या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. मुळात हेल्मेट सक्ती याचा या बाबींशी प्रत्यक्षात जरी संबंध येत नसला तरी या बाबी कळत-नकळत एकमेकांशी जोडल्या गेल्या आहेत, हे नाकारूनदेखील चालणार नाही. हेल्मेट सक्तीचा निर्णय घेण्यापूर्वी वाहनांच्या तुलनेत सरासरी दोन प्रवाशांचा विचार केल्यास बाजारामध्ये तितक्या संख्येने हेल्मेट विक्रीसाठी उपलब्ध आहेत का, याचाही आढावा घेणे आवश्यक होते. निर्णय घेता येतो, पण त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यापूर्वी आपण घेतलेल्या निर्णयाच्या दृष्टीने अंमलबजावणीसाठी येणाऱ्या अडथळ्यांचे निवारण करणे हेदेखील प्रशासनाचे कर्तव्य आहे.

अनेक भागांतील वाहतूक व्यवस्था ही रस्त्यावरील सिग्नलवर अवलंबून असते.

सिग्नल बंद पडल्यास अथवा सिग्नल यंत्रणेमध्ये बिघाड झाल्यास वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा उडतो व त्यातून वाहतूक कोंडीचा उद्रेक होतो. दुचाकी वाहनांचे होत असलेले अपघात पाहता चालक व चालकांसोबत असलेल्या प्रवाशांच्या जीवितरक्षणासाठी हेल्मेट सक्तीच्या निर्णयाचे समर्थन पोलिसांकडून करण्यात येत आहे. दुचाकी वाहनांचे अपघात हे वर्दळीच्या ठिकाणीच अधिक होतात. वर्दळीच्या ठिकाणी म्हणजे रस्त्यावर वाहनांच्या संख्येने नागरिकांची होत असलेली ये-जा अपघाताला निमंत्रण देत असते, खतपाणी घालत असते. रस्त्यालगत असलेल्या पदपथावर फेरीवाल्यांचे अतिक्रमण असल्याने पादचाऱ्यांना पदपथावर ये-जा करणे अवघड झाले आहे. फेरीविक्रेते व त्यांचे ग्राहक याचीच वर्दळ पदपथावर असते. पदपथ हे फेरीविक्रेत्यांचे व्यवसायाचे केंद्र बनले आहे. त्या-त्या भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांना पदपथ अतिक्रमणमुक्त करण्यात अपयश आले आहे. मुळातच पालिका, नगरपालिका प्रशासनातील अतिक्रमण विभागातील त्या-त्या संबंधितांचे फेरीवाल्यांकडून नियमित स्वरूपात खिसे भरले जात असल्याने पदपथावरील फेरीवाल्यांना प्रशासकीय घटकांकडूनच आश्रय मिळत गेला. न्यायालयाने पदपथ फेरीवाल्यांच्या अतिक्रमणातून मुक्त करण्यासाठी आदेश देऊनही या आदेशाची अंमलबजावणी होत नाही. कारण न्यायालयीन निर्णयाची अंमलबजावणी करण्यापेक्षा फेरीवाल्यांकडून नियमित मिळणारा आर्थिक मलिदा हा प्रशासकीय यंत्रणेला महत्त्वाचा वाटत आहे.फेरीवाल्यांनी पदपथ बळकावल्यामुळे रहिवाशांना ये-जा करण्यासाठी रस्त्यावरच यावे लागते. रस्त्यावर आधीच वाहनांची वाढलेली संख्या तसेच रस्त्यावरूनच सुरू असलेली लोकांची ये-जा यामुळे वाहने हाकणे दुचाकीस्वारांना अवघड होऊन बसते.

# मातीच्या तब्येतीची काळजी घेण्यासाठी किती वर्षांनी कराल माती परीक्षण?




**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक** - अधिक उत्पन्नाच्या हव्यासापोटी शेतजमिनीत विविध प्रकारच्या रासायनिक खतांचा वापर वाढला आहे. त्याचा विपरीत परिणाम होऊन जमिनीतील सुपीकता नष्ट होत चालली आहे. त्यामुळे पेरणीपूर्व मातीपरीक्षण करणे अत्यावश्यक ठरत असून, चांगल्या उत्पादनासाठी देखील ते अत्यंत महत्त्वाचे आहे.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

शेतकऱ्यांनी दर तीन वर्षांनी एकदा न चुकता मातीपरीक्षण करून घ्यावे, या माध्यमातून जमिनीत कोणत्या घटक द्रव्यांची उणीव आहे, त्याची माहिती कळू शकते. त्यानुसार, उपाययोजना करून शेतकरी उत्पन्न वाढवू शकतात, त्यामुळे जमिनीचे नेमके आरोग्य कळण्यासाठी मातीपरीक्षण करणे गरजेचे आहे. रासायनिक खताच्या अतिवापरामुळे जमिनीची तब्येत खराब झाली आहे. ज्या जमिनीत रासायनिक खतांचा अधिक वापर झाला आहे, तिथे पिकांवर कीटक व रोगांचा प्रादुर्भाव अधिक होण्याची शक्यता असते.

**माती परीक्षण म्हणजे नेमके काय?**

शेतजमिनीत नेमके कोणते गुण व दोष आहेत. कोणत्या घटक द्रव्यांची आवश्यकता आहे किंवा पिकानुसार कोणत्या खताचा वापर करावा लागेल, हे जाणून घेण्यासाठी मातीपरीक्षण करणे आवश्यक आहे.

**रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जीवाणू नष्ट**

अॅझोटोबॅक्टर प्रजाती मुक्त जिवंत, नायट्रोजन-फिक्सिंग जीवाणू आहेत; रायझोबियम प्रजातींच्या विरुद्ध, ते सामान्यतः वनस्पतींशी सहजीवन संबंधांशिवाय वातावरणातील आण्विक नायट्रोजनचे निराकरण करतात. मात्र, रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे हे जीवाणू नष्ट होत आहेत, अशी माहिती कृषी सहायक प्रशांत काटे यांनी दिली.

**किती वर्षांनी कराल माती परीक्षण?**

दर तीन वर्षांनी शेतजमिनीतील मातीचे परीक्षण करून घ्यायला हवे. यामुळे जमिनीचा पोत बिघडलेला असल्यास त्यावर प्रभावी उपाययोजना करता येणे शक्य होते.

**पिकांच्या वाढीसाठी हे घटक आवश्यक** - पिकांच्या अपेक्षित वाढीसाठी नत्र. स्फुरद, पालाश, कॅल्शियम, मॅग्नेशियम, सल्फर, कार्बन डायऑक्साईड, हायड्रोजन, ऑक्सिजन, लोह, मॅगनिज, बोरॉन, झिंक, कॉपर, मॉलिब्डेनम, क्लोरीन आदी घटक आवश्यक आहेत.

# कारागृहातील बंद्यांसाठी आध्यात्मिक प्रवचन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती, -** : सकल जैन समाज संस्था आणि श्री महाकाली माता शक्तीपीठ यांच्यातर्फे अमरावती येथील मध्यवर्ती कारागृहात आध्यात्मिक प्रवचन सोमवार, दि. २ डिसेंबर रोजी पार पडले.अपर पोलीस महासंचालक, कारागृह व सुधारसेवा प्रशांत बुरडे आणि कारागृह उपमहानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा स्वाती साठे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रम घेण्यात आला.सकल जैन समाज संस्थेचे सचिव अभिनंदन पेंढारी यांनी संस्थेचा अल्प परिचय करुन दिला. विविक्त श्री माताजी यांच्या आध्यात्मिक कार्याविषयी माहिती दिली. विविक्त श्री माताजी यांनी बंद्यांनी आहार, आचरण, विचाराबाबत मार्गदर्शन केले. महाकाली शक्तीपीठाचे शक्तीजी महाराज यांनी कारागृहातून सुटल्यानंतर स्वत:चा रोजगार करुन अनिष्ठ व्यक्ती आणि व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. कारागृह अधीक्षक किर्ती चिंतामणी यांनी आध्यात्मिक विचार आचरणात आणून वाईट प्रवृत्तीपासून दूर राहण्याचे सांगितले. कारागृहातील २७० बंद्यांनी यात सहभाग घेऊन सकारात्मक प्रतिसाद दिला.कार्यक्रमाचे आयोजन ललित मुंडे, संजय घोलप यांनी केले. कार्यक्रमासाठी शक्तीजी महाराज यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. यावेळी तुरुंगाधिकारी शामराव गिते, कारागृह शिक्षक मिलींद बनसोड, संजय घोलप व ललित मुंडे, सुभेदार गोपाल कचरे, श्रीकृष्ण लांजेवार उपस्थित होते.



# ईव्हीएमला दोष देण्यापेक्षा पराभवाची कारणे शोधा

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकांमध्ये महायुतीला मिळालेल्या अभूतपूर्व यशामुळे काँग्रेसप्रणीत महाविकास आघाडीचा धुव्वा उडाला आहे. २८८ जागा असलेल्या विधानसभेत महायुतीला २३६ जागांवर विजय मिळाल्याने, दोन दिवस उलटून गेल्यानंतरही पराभव कशामुळे झाला याचा अंदाज महाविकास आघाडीला लागत नाही. त्यातूनच उबाठा सेनेचे नेते व कार्यकर्ते यांनी पराभव खिलाडूवृत्तीने न स्वीकारता त्याचे खापर ईव्हीएम मशीनवर फोडले आहे. उबाठा सेनेच्या आरोपाला महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार गट पाठबळ देत आहेत. जणू महाराष्ट्रातील महायुतीचा विजय हा ईव्हीएमचा चमत्कार आहे, असा नरेटिव्ह तयार करण्याचा प्रयत्न करत आहेत. एवढेच नव्हे तर ईव्हीएमच्या विरोधात आता जनआंदोलन उभारण्याची भाषा विरोधी पक्षांतील नेत्यांकडून केली जात आहे. हरियाणामध्ये काँग्रेस हरली. जम्मू-काश्मीरमध्ये काँग्रेस नॅशनल कॉन्फरन्स जिंकली.

२३ नोव्हेंबर रोजी लागलेल्या निकालामध्ये झारखंडमध्ये काँग्रेस इंडिया आघाडी जिंकली. मात्र महाराष्ट्रात काँग्रेसचा सहभाग असलेली महाविकास आघाडी हरली. खरं तर हरल्यानंतर प्रत्येक पक्षाने आत्मचिंतन करण्याची गरज आहे. आपली ध्येयधोरण ही कितपत जनतेला आवडतात याचा विचार करायला हवा; परंतु तसे न करता, ईव्हीएमवर खापर फोडले, तर आपल्या पक्षातील नेत्यांच्या आणि पक्षांच्या चुका झाकण्यास मदत होईल, असेच बहुधा त्यांना वाटत असावे. लोकसभा निवडणुकीच्या आधी सर्वोच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. यावरील याचिकांवर एकत्रित सुनावणी घेत, पुढील निवडणुका ईव्हीएम मशीनवर होतील, असे खंडपीठाने स्पष्ट केले होते. मात्र या निवडणूक प्रक्रियेतील तांत्रिक दोष दूर करून, उमेदवार आणि मतदारांचे समाधान व्हायला हवे, अशा सूचना निवडणूक आयोगाला न्यायालयाने दिल्या होत्या.दरम्यान, सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीदरम्यान, तज्ज्ञांचा एक अहवालही मागितला होता. त्यातून ईव्हीएम हॅक होऊ शकते, याचा पुरावा कोणालाही देता आला नव्हता. आता मुंबईत उबाठा सेनेला दारुण पराभवाला सामोरे जावे लागले असले तरी, आदित्य ठाकरेंच्या वरळी मतदारसंघात, वरुण सरदेसाईंच्या वांद्रे (पूर्व) मतदारसंघात व सेना भवनाची वास्तू असलेल्या माहीम मतदारसंघात उबाठा सेनेला यश मिळाले. तो विजय ते नाकारणार आहेत का? किंवा या मतदारसंघातील ईव्हीएम मशीनची तपासणी झाली पाहिजे, अशी मागणी करताना कोणी दिसत नाही. लाडक्या बहिणी, युवावर्ग, शेतकरी व कामगार वर्ग भक्कमपणे सरकारच्या बाजूने उभा राहिल्यानेच महायुतीला मोठा विजय मिळाला आहे.

त्याचप्रमाणे, जगभरात इस्लामीकरणाचा प्रसार वेगाने होत आहे. ब्रिटन, फ्रॉन्ससारखे देशही या संकटातून कसे बाहेर पडावे याचा विचार करताना दिसत आहेत. त्यात मुंबईसह राज्यात गेल्या काही वर्षांत लव्ह जिहाद, लॅन्ड जिहाद यांसारख्या घटना घडत असल्यानेच, युवा हिंदू नेतृत्व आमदार नितेश राणे यांच्या नेतृत्वाखाली राज्यात सकल हिंदू समाजाच्या वतीने आयोजित केलेल्या मेळाव्याला हजारोंची उपस्थिती लाभत होती. हा जनतेमधील अंडर करंट ओळखायला विरोधकांना वेळ मिळाला नाही. त्यातून विशिष्ट धर्माची मते कशी आपल्या बाजूने राहतील याची रणनिती महाविकास आघाडीतील नेत्यांनी आखल्याचा फटका बसल्याचे निकालातून दिसून आले आहे.



पूर्वी बॅलेट पेपरवर मतदान होत असे; परंतु मतदान केंद्र ताब्यात घेणे. मतपेट्या पळविणे असे गैरप्रकार घडले आहेत. तसे पाहायला गेले तर नवीन तंत्रज्ञानाला स्वीकारण्यास आपल्याला वेळ लागला. भारतात पहिल्यांदा जवळपास ४० वर्षांपूर्वी ईव्हीएम वापरण्यात आले. १९८२ च्या केरळ विधानसभा निवडणुकी दरम्यान, परूर या एका मतदारसंघात ईव्हीएम मशीन वापरण्यात आले. या निवडणुकीत ईव्हीएमचा वापर हा एक प्रयोग होता. तेव्हा त्यावेळचे काँग्रेसचे उमेदवार, ए. सी. जोस यांनी पहिल्यांदा ईव्हीएमवर निशाणा साधला होता. मात्र ईव्हीएमच्या मतमोजणीत काही गैरप्रकार होतो असा तो आरोप नव्हता, तर त्याचा वापरच बेकायदेशीर असल्याचा युक्तिवाद जोस यांनी सर्वोच्च न्यायालयात केला होता. ए. सी. जोस देखील तेव्हा निवडणूक हरले होते. ईव्हीएम ब्लेम गेमसाठी होता, हे न्यायालयाच्या निदर्शनास आले होते. देशभरात २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी ईव्हीएम हटाव, देश बचाव असा नारा देत काही संघटनांकडून दिल्लीत जंतर-मंतरवर आंदोलन करण्यात आले होते. दुसऱ्या बाजूला सर्वोच्च न्यायालयातील वकिलांकडून याचिका दाखल करून ईव्हीएम बंद करण्याची मागणी करण्यात आली होती.

गडबडीचा आरोप होत असेल, तर त्यात सुधारणा करायला हव्यात; परंतु ईव्हीएम मशीनवरून पुन्हा बॅलेट पेपरवर मतदान प्रक्रिया राबविण्याचा विचार म्हणजे देशाला पुन्हा मागे नेण्यासारखे आहे, अशी टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली होती. लोकसभा निवडणुकीत भाजपाला २४० जागा मिळाल्या. २७२ चा बहुमताचा आकडा गाठता आला नव्हता. जर केंद्र सरकारच्या हातात सर्व यंत्रणा असती, तर ४०० पारचा नारा दिल्याप्रमाणे भाजपा लोकसभा निवडणुकीत घडू शकले असते. पण, तसे झाले का? तर नाही. त्यामुळे आता महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या महायुतीच्या यशाकडे संशयाकडे पाहण्यात काय अर्थ आहे. महाविकास आघाडीतील नेत्यांनी आपला पराभव का झाला याची कारणे शोधावी. जनमताचा आदर करून ईव्हीएमवर खापर फोडणे आता तरी थांबवावे तूर्त एवढेच सांगावेसे वाटते.




## रात्रीच्या जेवणात अजिबात खाऊ नयेत असे ५ पदार्थ, वेळीच लक्ष द्या नाहीतर..


**दि.४विदर्भ प्रजासत्ताक**

सकाळचा नाश्ता एखाद्या राजाप्रमाणे, दुपारचे जेवण सामान्य माणसाप्रमाणे तर रात्रीचे जेवण एखाद्या भिकाऱ्याप्रमाणे असावे. असे आपल्याकडे म्हटले जाते. याचाच अर्थ सकाळचा नाश्ता खूप हेव्ही पोटभरीचा तर रात्रीचे जेवण हे अगदी कमी असावे. आपले आरोग्य आपल्या लाईफस्टाइलशी निगडीत असते. आहार-विहार चांगला असेल तर आपले आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. नाहीतर आपल्याला कमी वयातच आरोग्याच्या वेगवेगळ्या तक्रारी भेडसावण्यास सुरुवात होते. आहाराचे काही नियम असतात आणि ते नियम पाळले तर आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. रात्रीच्या वेळी झोपताना काही गोष्टी आहारात आवर्जून टाळायला हव्यात. रात्रीचा आहार हा हलका आणि सहज पचेल असा असावा. रात्री झोपताना जर जड पदार्थ खाल्ले तर ते पचत नाहीत आणि त्यामुळे पचनशक्तीवर ताण येण्याची शक्यता असते.

**रात्रीच्या वेळी जेवणांत कोणते पदार्थ खाणे टाळावे ?** १. गव्हापासून तयार केलेले पदार्थ :- रात्रीच्या वेळी गव्हापासून तयार केलेले पदार्थ खाणे शक्यतो टाळावे. गहू आणि गव्हापासून तयार केलेले पदार्थ हे पचनास थोडे जड असतात त्यामुळे रात्रीच्या जेवणांत शक्यतो असे पदार्थ खाणे टाळावे. तसेच हे पदार्थ वेळीच पचले नाही तर आपल्याला अपचन, ॲसिडिटी किंवा पोटाचे आजार यासंबंधित अनेक आजार होऊ शकतात.

**२. दही** :- दह्यामध्ये प्रोटीन असल्याने ते आरोग्यासाठी आवश्यक असते. पण दही पचायला काही प्रमाणात जड असल्याने ते रात्रीच्या वेळी खाणे शक्यतो टाळायला हवे. तसेच दही प्रकृतीने थंड असल्याने त्यामुळे सर्दी-कफ यांसारख्या समस्या होण्याची शक्यता असते.

**३. मैदा** :- रात्रीच्या जेवणांत शक्यतो मैदा आणि मैद्यापासून तयार केलेले पदार्थ खाणे टाळावे. मैदा आणि



मैद्यापासून तयार झालेले पदार्थ हे गव्हापेक्षा पचायला अधिकच जड असतात. यासाठी गव्हासोबातच मैदा देखील खाणे टाळावे.

**४. गोड पदार्थ** :- काहीजणांना जेवणानंतर गोड पदार्थ खाण्याची सवय असते. परंतु ही सवय आपल्या आरोग्यासाठी अपायकारक ठरु शकते. साखर पचायला जड असल्याने ती शक्यतो सूर्यास्त होण्याच्या आत खायला हवीत असे सांगितलेले आहे. जेवणानंतर गोड पदार्थ खाण्याच्या सवयीमुळे आपल्या पचनक्रियेत बिघाड होऊ शकतो. तसेच पचनक्रियेच्या कार्यात अडथळा येऊ शकतो. यासाठीच जेवणानंतर गोड पदार्थ खाणे टाळावे.

**५. कच्चे सॅलॅड** :- रात्रीच्या जेवणासोबत कच्ची कोशिंबीर आणि सॅलॅड खाणे शक्यतो टाळावे. कच्चे सॅलॅड हे कोरडे आणि थंड असते. ज्यामुळे वात अनेक पटींनी वाढू शकतो. त्याऐवजी, आपण शिजवलेले किंवा ग्रील्ड केलेले तसेच वाफवलेल्या भाज्या खाव्यात.

# सोयाबीन खरेदी २ टक्केच, उद्दिष्ट होते १४ लाख टनांचे

## शेतकऱ्यांकडील सोयाबीन संपले, आता खरेदी कोणती करणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४पुणे :-** हमीभावाने सोयाबीन खरेदी करण्याच्या सरकारच्या उद्देशांना हरताळ फासण्यात आला आहे. नाफेड आणि नॅशनल को-ऑपरेटिव्ह कन्ज्युमर्स फेडरेशन ऑफ इंडिया लि. या संस्थांना १४ लाख टनांचे उद्दिष्ट असताना २५ नोव्हेंबरपर्यंत २०६ केंद्रांवर केवळ २७ हजार ८२८ टन अर्थात २ टक्के सोयाबीनची खरेदी झाली. खरेदीला आता १५ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली. शेतकऱ्यांकडे सोयाबीनच नसल्याने खरेदी कशी होईल असा प्रश्न आहे.

गेल्या वर्षी शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५ हजार रुपयांचे अनुदान दिल्यानंतर यंदा हमीभावाने सोयाबीन खरेदीचा निर्णय राज्य सरकारने घेतला. त्यासाठी ४,८९२ रुपये प्रति क्विंटलने सोयाबीन खरेदी करण्याचे निर्देश नाफेड आणि नॅशनल को-ऑपरेटिव्ह कन्ज्युमर्स फेडरेशन ऑफ इंडिया लि. या दोन संस्थांना देण्यात आले.

**राज्यात ५० लाख टन उत्पादन ?**

कृषी विभागाच्या आकडेवारीनुसार राज्यात यंदा सोयाबीनचे क्षेत्र ५० लाख हेक्टरवर पोहोचले आहे. प्रति हेक्टरी १० क्विंटल उत्पादन गृहीत धरले तरी राज्यात सुमारे ५० लाख टन सोयाबीन उत्पादन होऊ शकते, असा कृषी विभागाचा अंदाज आहे.तरीदेखील राज्य सरकारने १४ लाख १३ हजार २७० टन खरेदीचे उद्दिष्ट दोन्ही संस्थांना दिले. ऐन काढणीच्या वेळेस राज्यात पावसाने धुमाकूळ घातल्याने सोयाबीनला मोठा फटका बसला. त्यामुळे उत्पादनात मोठी घट झाली. ३ नाफेडने १ ऑक्टोबर रोजी शेतकऱ्यांना नोंदणी करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिली. तर प्रत्यक्षात खरेदीला सुरुवात १५ ऑक्टोबरनंतरच झाली.



RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. ४ डिसेंबर २०२४ शहर/ग्रामिण


## गुलाबी थंडी गेली तरी कुठे?

### फेंगल इफेक्टमुळे 'नभ मेघांनी आक्रमिले'

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती–** गेल्या चार दिवसांपासून असलेल्या ढगाळ वातावरणाने थंडीला पार दूर केले आहे. रात्रीच्या तापमानात मंगळवारपर्यंत ८ अंशाने वाढ झाली वते २१ अंशावर उसळले आहे, जे सरासरीपेक्षा तब्बल ७.८ अंशाने अधिक आहे. त्यामुळे आता अमरावतीकरांच्या अंगावरचे स्वेटर दूर झाले आहे. दिवसा पारा सरासरीत असल्याने थोड्या प्रमाणात गारव्याची जाणीव होत आहे.फेंगल चक्रीवादळ पुडुचेरीमध्ये शांत झाले असताना कर्नाटक किनारपट्टीवर अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे, जो मंगळवारी मध्य अरब सागरात सरकला आहे. यासोबत तयार झालेले सायक्लोनिक सर्क्युलेशन पुढच्या दोन दिवसात मध्यपूर्व अरबी समुद्रात तयार होण्याचा अंदाज आहे. या प्रभावाने अमरावतीसह विदर्भ महाराष्ट्रात पुन्हा तीन दिवस ढगाळ वातावरण राहून उसळलेले तापमान कायम



राहण्याची शक्यता आहे.दरम्यान, ढगाळ वातावरणामुळे किमान तापमानाने चांगलीच उसळलीघेतली आहे. नागपूरशिवाय अकोल्यात सर्वाधिक २२ अंश किमान तापमानाची नोंद झाली आहे.चंद्रपूरचा पारा सर्वात कमी १७ अंशावर आहे. गोंदिया, वर्धा, बुलढाणा, वाशिम २० अंशाच्यावर आणि अमरावती २१, भंडारा १९ अंशावर आहेत. हवामान विभागाच्या अंदाजानुसार वातावरणाची ही स्थिती पुढचे तीन दिवस कायम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे ढगाळ वातावरण राहून वाढलेले तापमान कायम राहील, असा अंदाज आहे. ७ डिसेंबरनंतर ढगांची गर्दी हटून पुन्हा थंडीचा तडाखा वाढेल, अशी शक्यता आहे.–

# अमरावती विभागात चार हजार कोटींचा हिशेब नाही

## विभागीय आयुक्तांना स्पष्टीकरण देण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती–** गत ५० वर्षांत अमरावती विभागातील विविध नगरपरिषदा, नगर पंचायतींच्या लेखापरीक्षणात आढळून आलेल्या त्रुटींमध्ये चार हजार कोटीहून अधिक रक्कम गुंतलेली असल्याचा दावा करणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात शेखर काण्णव यांनी दाखल केली होती. या याचिकेची गंभीर दखल घेत उच्च न्यायालयाने मोठ्या प्रमाणावर पाणी मुरत असल्याची शंका व्यक्त केली आणि अमरावतीचे विभागीय आयुक्त यांना जबाब नोंदवण्याचे आदेश दिले आहेत.

गत ५० वर्षांत अमरावती विभागातील विविध नगरपरिषदा, नगर पंचायतींच्या लेखापरीक्षणात आढळून आलेल्या त्रुटींमध्ये चार हजार कोटीहून अधिक रक्कम गुंतलेली असल्याचा दावा करणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात शेखर काण्णव यांनी दाखल केली होती. या याचिकेची गंभीर दखल घेत उच्च न्यायालयाने मोठ्या प्रमाणावर पाणी मुरत असल्याची शंका व्यक्त केली आणि अमरावतीचे विभागीय आयुक्त यांना जबाब नोंदवण्याचे आदेश दिले आहेत.याचिकेवर न्या. नितीन सांबरे आणि न्या. वृषाली जोशी यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली. याचिकेनुसार, प्रत्येक नगर परिषद, महापालिकांचे लेखापरीक्षण हे त्यांच्या कार्यकक्षेतील लेखा परीक्षक कार्यालयातर्फे करण्यात येते. लेखापरीक्षण पूर्ण झाल्यानंतर त्याचा अहवाल संबंधित नगर परिषदांना पाठवण्यात येतो. त्यामधील त्रुटींची पूर्तता ही अहवाल प्राप्त झाल्यापासून १२० दिवसांमध्ये करणे अनिवार्य आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विविध विभागांचे लेखापरीक्षण एकाच वेळी होते. प्रत्येक वर्षाच्या लेखापरीक्षणामध्ये आधीच्या वर्षातील जितके प्रलंबित परिच्छेद आहेत, त्याची संख्या नमूद करण्यात येते. दरवर्षी या प्रलंबित परिच्छेदांमध्ये सातत्याने वाढ होत असून यात कोट्यवधींची रक्कम गुंतलेली आहे.


### याचिकेतील दावा धक्कादायक

उच्च न्यायालयाने याप्रकरणाची गंभीर दखल घेतली. याचिकेतील दावा हा धक्कादायक आहे. काहीतरी मोठा घोळ असल्यामुळे लेखापरीक्षणात त्रुटी दिसत आहेत. मोठ्या प्रमाणात पैशाचा गैरवापर झाल्याचा संशय यामुळे येतो, असे मत उच्च न्यायालयाने व्यक्त केले. याप्रकरणावर विभागीय आयुक्तांनी स्पष्टीकरण दिल्यावर योग्य ते आदेश देऊ, असे न्यायालयाने निर्णयात स्पष्ट केले.

## गडचिरोली, गोंदिया जिल्ह्यात भूकंपाचे सौम्य धक्के; तेलंगणात भूकंपाचा केंद्रबिंदू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४गोंदिया गडचिरोली –** तेलंगणा राज्यातील मुलुगु येथे सकाळी ७ वाजून २७ मिनिटांनी भूकंपाचे तीव्र धक्के जाणवले आहेत. या भूकंपची तीव्रता ५.३ रिक्टर स्केल अशी नोंदविण्यात आलेली आहे. मुलुगु भूकंपाचे केंद्रबिंदू असले तरी महाराष्ट्रातील गडचिरोली, गोंदिया, भंडारा जिल्ह्यातही भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले आहे. त्यामुळे



याठिकाणी नागरिकांमध्ये दहशत पसरली आहे.

याबाबत प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे. अशा प्रकारचे धक्के पुन्हा जाणवल्यास नागरिकांनी दक्षता घ्यावी व घाबरून न जाता इमारती बाहेर मोकळ्या जागेत सुरक्षित स्थळी आश्रय घ्यावा असं आवाहन गडचिरोलीचे जिल्हाधिकारी संजय दैने यांनी केले आहे. भूकंपाच्या धक्क्यामुळे प्रशासन अलर्ट मोडवर आले आहे. या भूकंपाचे पडसाद अनेक ठिकाणी जाणवले. तेलंगणात भूकंपाचे तीव्र धक्के पाहता संबंधित विभाग मदतकार्यासाठी सज्ज झाल्याची चर्चा परिसरातील नागरिकांतून होत आहे.

## अंजनसिंगी येथील तहकूब ग्रामसभा आता ५ डिसेंबर रोजी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अंजनसिंगी–** स्थानिक ग्रामपंचायत अंतर्गतविविध विषयावर ग्रामसभेचे आयोजन २८ नोव्हेंबर रोजी करण्यात आले होते परंतु ग्रामसभेची पाहिजे त्या प्रमाणात प्रसिद्धी न दिल्यामुळे ग्रामसभा कोरम अभावी रद्द करण्यात आली. आता ही ग्रामसभा ५ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आली आहे.

सदर ग्रामसभेला सरपंच रुपाली गायकवाड, सरोदे, धनराज पाटील, पंकज काळे, अशोक काळे यांच्यासह केवळ १५ ते २०नागरिकच उपस्थित होते.

ग्रामसभेकरिता कमीत कमी १०० नागरिकांची आवश्यकता आहे पण गेल्या चार वर्षापासून ग्रामपंचायतीचा ग्रामसभेचा कोरम कधीच पूर्ण झाला नाही. त्याचे कारण म्हणजे ग्रामसभेची सात दिवसांपूर्वी मुनादी देणे गरजेचे आहे. त्यानंतर ग्रामसभेच्या तीन दिवसाआधी पुन्हा मुनादी देणे आवश्यक आहे पण तसं होताना कधीच दिसले नाही. येत्या पाच डिसेंबरला तहकुब ग्रामसभा आयोजित केली आहे. ग्रामस्थांनी वेळेवर हजर राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# विद्यार्थिनीच्या विनयभंगप्रकरणी संतप्त पालकांनी केली शिक्षकाची धुलाई

## कार ही फोडली;पोलिसांनी केली शिक्षकास अटक


**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अचलपूर**

अचलपूर तहसील अंतर्गत येणाऱ्याशिंदी बु. येथील एका खाजगी संस्थेअंतर्गत चालविल्या जाणाऱ्या हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थीनीचा इंग्रजी विषयाच्या प्राध्यापकाने विनयभंग केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला. यानंतर संतप्त पालकांनी शाळेवर धडक देत शिक्षकाच्या कृत्याचा निषेध करत त्याला आमच्या ताब्यात द्या, अशी मागणी करत शाळेच्या परिसरात ठेवलेल्या शिक्षकाच्या कारची तोडफोड केली.



घटनेची माहिती होताच पथ्रोट पोलिस स्टेशनचे अधिकारी तत्काळ घटनास्थळावर दाखल होत परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे लक्षात येताच त्यांनी एसआरपीएफ पथक वअतिरिक्त पोलिसांची कुमक घटनास्थळी बोलावली. या दरम्यान पालकांनी शाळेच्या आवारात घुसून शिक्षकाला ओढण्याचा प्रयत्न केला. मात्र त्या शिक्षकाने आपल्या बचावाकरिता स्वतःला एका खोलीत कोंडून घेतले. पोलिस अधिकाऱ्यांनी व नागरिकांना शांत करण्याचा प्रयत्न केला मात्र संतप्तनागरीक शिक्षकांप्रती रोष व्यक्त करत असतांना या शिक्षकास पोलिसांच्या सुरक्षतेत वाहनात बसून पथ्रोट येथे नेण्यात आले.





शाळेच्या मुख्याध्यापकांनी दिलेल्या माहीतीनुसार इंग्रजीच्या शिक्षकाने २५ नोव्हेंबर रोजी विद्यार्थीनीचा विनयभंग केला ही बाब मुख्याध्यापक आज सुटीवरुन शाळेत परत आल्यानंतरविद्यार्थीनीने बोलून दाखविली. या घटनेचे गांभीर्य पाहता मुख्याध्यापकाने तत्काळ शिक्षक व पालकांना बोलावून घेत हा प्रकार सविस्तर जाणून घेतला व पालक व मुख्याध्यापकांनी घडलेल्या प्रकाराची माहीती पोलिसांना दिली.

पथ्रोट पोलिस विद्यार्थीनीचे बयान नोदवित असून पुढील कारवाई सुरुहोती. गावात पोलिसांचा चोख बंदोबस्त असून पालकांना शांतता ठेवण्याचे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी केले आहे. मिळालेल्या माहितीनुसार या शिक्षकाने यापूर्वीही याच संस्थेअंतर्गत येणाऱ्या हरम येथील विद्यार्थीनीची अशाच प्रकारे छेड काढल्याची तक्रार दाखल झाली होती.

## नियोजित कामांच्या मान्यतांची कार्यवाही विहित वेळेत पूर्ण करा -जिल्हाधिकारी अजित कुंभार

### जिल्हा वार्षिक योजनेचा आढावा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अकोला–** डिसेंबर महिना आला तरीही अद्याप अनेक विभागांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यतांची कार्यवाही पूर्ण झालेली नाही. हे गंभीर आहे. ही कार्यवाही तत्काळ पूर्ण करून विकासकामे विहित मुदतीत पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे दिले.जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण आढावा बैठक नियोजनभवनात जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली झाली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी एकात्मिक आदिवासी प्रकल्प संचालक मोहनकुमार व्यवहारे, जिल्हा नियोजन अधिकारी गिरीश शास्त्री, समाजकल्याण सहायक आयुक्त अनिता राठोड, नियोजन अधिकारी कैलास देशमुख यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्री. कुंभार म्हणाले की, जिल्ह्यात मंजूर नियतव्ययानुसार विविध विकासकामे विहित वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे. तांत्रिक व प्रशासकीय मान्यतांची कार्यवाही होऊन विकासकामांना चालना मिळाली नाही तर निधी इतर विकासकामांकडे वळविण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. ज्या विविध विकासकामांना चालना देण्यात आली, ती तत्काळ पूर्ण होणे आवश्यक आहे. कामे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार व्हावीत. शाळा बांधकामअंतर्गत ३८ कामांपैकी ६ पूर्ण व ३१ प्रगतीपथावर आहेत, ती पूर्ण व्हावीत. पशुवैद्यकीय संस्थांना औषधपुरवठाअंतर्गत पुढील तरतुदीसाठी प्रस्ताव येणे आवश्यक होते. तो तत्काळ द्यावा. जिल्हा रूग्णालयाला तीन रूग्णवाहिकांसाठी वाढीव निधी लागल्यास उपलब्ध करून दिला जाईल. सर्व विभागांनी आयपास प्रणालीचा वापर करूनच कार्यवाही पूर्ण करावी, असे निर्देश त्यांनी दिले.सर्व विभागांनी आपल्याकडील अखर्चित निधी तत्काळ जमा करण्याची, तसेच आवश्यक अनुपालनाची पूर्तता करण्याची सूचनाही यावेळी करण्यात आली. लघुपाटबंधारे, वन, औद्योगिक प्रशिक्षण, क्रीडा, मत्स्यसंवर्धन, महावितरण, महाऊर्जा, रस्ते सुरक्षा विकास आदी विविध विभागांचा आढावा यावेळी घेण्यात आला.

## हावडा-अहमदाबाद एक्सप्रेसच्या हॉट एक्सेलमध्ये बिघाड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४धामणगाव रेल्वे–** अहमदाबादहून हावडा येथे जाणारी अहमदाबाद-हावडा एक्सप्रेस (गाड़ी नंबर १२८३३) मंगळवारी (ता. तीन) दुपारी ३ वाजून ५९ मिनिटाला धामणगाव रेल्वे स्टेशनवर आली असता, गाडीच्या हॉट एक्सलमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने रेल्वेगाडी धामणगाव स्टेशनवरच बराच वेळ उभी राहिली. परिणामी प्रवाशांना ताटकळत रहावे लागले. या घटनेची माहिती रेल्वे दुर्घटना राहत पथकाला देण्यात – आली. वर्धा येथून दुरुस्ती पथक धामणगाव



दाखल येथे झाले. रेल्वेगाडीच्या एस-५ या बोगीच्या हॉट एक्सलमध्ये बिघाड झाल्याने या बोगीला गाडीपासून वेगळे वेगळे करण्यात आले. दुरुस्तीच्या कामाला तीन ते चार तास वेळ झाल्याने प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागला.

धामणगाव रेल्वे स्टेशनपासून काही अंतरावर गत आठवड्यात रुळाचा सांधा उखडला होता. अनेक समस्या एकामागे एकउद्भवत घाएर रेल्वे स्टेशनच्या ठिकाणी पुरेशी सुरक्षा नसल्याने यंत्रणा अडचणी निर्माण होत आहे. आरपीएफ, जीआरपी कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याने कोणतीही घटना घडल्यास वर्धा किंवा बडनेरा येथील सुरक्षा कर्मचाऱ्यांची वाट पहावी लागते. तेव्हा सुरक्षा यंत्रणांमध्ये वाढ व्हावी, अशी मागणी नागरिकातून केली जात आहे.

## ढगाळ वातावरणामुळे तूर, हरभरा, ज्वारी पिकाला फटका

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक**

**मोर्शी–** सध्या सगळीकडे सर्वत्र ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. त्यात हवामान खात्याने अवकाळी पावसाचा इशारा दिल्यामुळे रब्बी हंगामातील तूर, हरभरा, ज्वारी पिकाला फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे अंजनगाव बारीसह परिसरातील शेतकरी चांगलाच धास्तावला आहे.



गेल्या वर्षी रब्बी हंगामात शेतकऱ्यांनी हरभरा व तूर पिकांची पेरणी केली होती. त्यानंतर मात्र अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने रब्बी पीक शेतकऱ्यांच्या हातातून गेली होती. शासनाने तुटपुंजी मदत केली होती तर काही शेतकऱ्यांनी नुकसान भरपाईची रक्कमही मिळाली नव्हती. गेल्या वर्षी धुके व ढगाळ वातावरणामुळे तूर पिकांवर रोगाचा प्रादुर्भाव झाला होता. आता हवामानात बदल झालेला आहे. शिवाय १० डिसेंबरपर्यंत ढगाळ वातावणासह अवकाळी पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील पिकांची चिंता लागली असून शेतकऱ्यांसमोर मोठे अस्मानी संकट उभे आहे. ढगाळ वातावरणामुळे पिकांवर अळी व अन्य रोगांचाप्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. तालुक्यातील अंजनगाव बारी परिसरातील १५० हेक्टर रब्बी पेरणी झाली. त्यामध्ये तूर व हरभरा पिक बहरलेल्या अवस्थेत आहे.

## अंबा रुख्मिणी महोत्सव २०२४ मध्ये भव्य विदर्भस्तरीय एकता मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**कौंडण्यपूर–** कडकडत्या थंडीत तब्बल १० किलोमीटरचे अंतर पार करून शेकडो स्पर्धकांनी कौंडण्यपूरच्या अंबा रुख्मिणी महोत्सव मध्ये एकच जल्लोष केला. महोत्सव विदर्भाचा, विदर्भाच्या पुरातन राजधानीचा नामक अंबा रुख्मिणी महोत्सव २०२४ मध्ये दिनांक ३० नोव्हेंबर रोजी भव्य विदर्भस्तरीय एकता मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तब्बल ५१ हजार रुपयांचे बक्षिसे ठेवण्यात आली होती. ज्यामध्ये तब्बल नऊ स्पर्धकांनी यामध्ये बाजी मारली. थंडीच्या दिवसात युवकांचा उत्साह बघून तरुणाईला उजाळा मिळाला असे प्रतिपादन यावेळी स्वागताध्यक्ष रविराज देशमुख यांनी मॅरेथॉन स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाला केले. सर्वप्रथम पहाटे ६. ०० वाजता सुरु झालेल्या या मॅरेथॉन स्पर्धेचे उदघाटन रविंद्रजी हाडे (तिवसा खरेदी विक्री



संचालक) यांनी केले. तर विशेष अतिथी म्हणून डॉ. उमेश राठी (पी. ई. एफ. आय. विदर्भ चाप्टर), डॉ. अतुल पाटील (सचिव, अमरावती अथेलेटिक असोसिएशन अमरावती), डॉ. अजय बोंडे (अध्यक्ष, संत नामदेव महाराज साहित्य परिषद अमरावती), राहुल तिवस्कर (मेजर लेफ्टनंट हवालदार, भटिंडा पंजाब), प्रेमदास राठोड (सरपंच, गट ग्रामपंचायत कौंडण्यपूर) आदींची उपस्थिती होती. या स्पर्धेला तब्बल नऊ पारितोषिक ठेवण्यात आले. ज्यामध्ये प्रथम बक्षीस ९,९९९ रुपये (सरपंच प्रेमदास राठोड व सौ सविताताई राऊत), द्वितीय बक्षीस ८,८८८ रुपये (सर्व ग्रामपंचायत सदस्य, गट ग्रामपंचायत सदस्य), तृतीय बक्षीस ७,७७७ रुपये (श्री अंबा रुख्मिणी सांस्कृतिक महोत्सव समिती, श्री क्षेत्र कौंडण्यपूर), चतुर्थ बक्षीस ६,६६६ रुपये (कृणाल कडू, तालुका अध्यक्ष युवा स्वाभिमान पार्टी), पाचवे बक्षीस ५,५५५ रुपये (रविंद्रजी हांडे, संचालक तिवसा खरेदी विक्री संघ), सहावे बक्षीस ४,४४४ रुपये (सागर भिल, अभय मेहकर, विकी मेहकर, गौरव ठाकरे, सागर केवदे), सातवे बक्षीस ३,३३३ रुपये (शुभम भाऊ बोके, मिर्चापूर), आठवे बक्षीस २,२२२ रुपये (प्रशांतभाऊ अनेरकर व किशोरभाऊ अनेरकर), नववे बक्षीस १,१११ रुपये (प्रफुल देऊळकर) यांच्याकडून ठेवण्यात आले होते. संपूर्ण विदर्भातून आलेले विजेते स्पर्धक हजारो रुपयांच्या बक्षिसांचे मानकरी ठरले.

# ५ हजार सरकारी शाळांना निवडणुकीनंतर पहिला दणका

## गरिब कुटुंबातील विद्यार्थ्यांची सज्ञान पिढी घडविण्यालाच सुरुंग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती** – विधानसभा निवडणुकीनंतर १० पेक्षा कमी पटसंख्येच्या सुमारे ५ हजार शाळांना पहिला दणका बसणार असून या शाळा वाडी, शहरालगतच्या झोपडपट्टीची वस्ती, आदिवासी पाडे, वंजारी समाजाचे तांडे, कमी लहान गावांतल्या शाळांसह दलित वस्तीतल्या एकूण ५ हजार सरकारी शाळांतील शिकविण्याची जबाबदारी शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण नसलेल्या कंत्राटी शिक्षकांच्या हवाली करण्यात येणार आहे. यातून गरीब वस्तीतील कुटुंबातली सज्ञान पिढी घडविण्याच्या संकल्पनेलाच सुरुंग लागणार आहे. यानंतर २० पेक्षा कमी पटसंख्येच्या सुमारे १४ हजार सरकारी शाळांवर गंडांतर येणार आहे. यातून या शाळांतून शिक्षण घेणाऱ्या किमान पावणेदोन लाख गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दर्जालाच दणका बसणार आहे.

१० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळांतील विद्यार्थ्यांना शिकविण्याची जबाबदारी १५ हजार रुपये दर महिन्यांच्या वेतनावर १ वर्षाकरिता नियुक्त केलेल्या शिक्षकांवर सोपविली जाणार आहे. या शिक्षकांकरिता किमान शैक्षणिक पात्रता अटही शिथिल केली गेली आहे. या सरकारी धोरणाच्या अंमलबजावणीची सुरुवात करण्याचा फतवा सांगली जिल्हा परिषदेने काढला आहे. याकरिता पहिला शासकीय आदेश १५मार्च २०२४ रोजी काढला गेला होता. दुसरे परिपत्रक शालेय शिक्षण तसेच क्रीडा संचलनालयाने २६ ऑक्टोबर २०२४ रोजी काढले. त्यात २४ डिसेबर २०२४ पूर्वी एक वर्षाकरिता कंत्राटी शिक्षक नियुक्त केले जावेत, असे नोंदविले आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांच्या कमी पटसंख्येची अट फक्त सरकारी शाळांनाच असून खासगी शाळांना ही पटसंख्येची अट लागू नाही. पटसंख्येच्या निकषावर सरकारी शाळा बंद करून प्राथमिक शिक्षणाचे क्षेत्र पूर्णपणे कार्पोरेट क्षेत्राच्या हवाली करण्याच्या शासकीय धोरणाचा यातून संशय यायला लागला आहे. यात संविधानातील कलम २१ (अ), विद्यार्थ्यांच्या मोफत शिक्षणाचा हक्क कायदा २००९ बासनात गुंडाळले जात असल्याचेही भान राखले गेले नाही. बाळाचे पाय पाळण्यात दिसतात, याच उक्तीप्रमाणे महायुती सरकारचे पाय धोरणात दिसू लागले आहेत. यात शैक्षणिक नुकसान होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सज्ञानतेलाच सुरुंग लागून या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे भवितव्य अंधारात लोटण्याचाच हा प्रकार आहे. पालकांनी याबाबत लगेचच सावध होण्याची गरज आहे. अज्ञानी घडविण्याचाच हा प्रकार आहे.

कमी पटसंख्येच्या शाळांतील नियमित शिक्षक इतर शाळांत बदलविले जाणार आहे. या धोरणाने वाडी.वस्ती, तांडे, पाडे, दलित



वस्तीत हलाखीचे जीवन जगणाऱ्या कुटुंबातील विद्यार्थ्यांचे शिक्षण प्रभावित होणार. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास, शिक्षणाचे सामाजिकीकरण, या धोरणासोबत विसंगत आहे. एक वर्षाचा कंत्राटी शिक्षक बदलून किंवा नोकरी सोडून गेल्यास या विद्यार्थ्यांच्या पूर्वीच्या शैक्षणिक दर्जाची जबाबदारी कोणावर, हाही प्रश्नच आहे. समाजातील घटकांनी याबाबत गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

**विजय कोंबे,** राज्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती

## सुवर्ण मंदिर परिसरात माजी उपमुख्यमंत्री सुखबीर सिंग बादल यांच्यावर गोळीबार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमृतसर–** पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री आणि शिरोमणी अकाली दलाचे नेते सुखबीर सिंग बादल यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला आहे. अमृतसरच्या सुवर्ण मंदिर परिसरात ही घटना घडली. बादल यांच्यावर झालेल्या गोळीबारात ते थोडक्यात बचावले. सुवर्ण मंदिर प्रवेशद्वारावर सुखबीर सिंग बादल सेवा करत होते त्यावेळी एका व्यक्तीने अचानक गोळीबारी केली. सुरक्षा रक्षकांनी तात्काळ या हल्लेखोराला पकडले. नुकतेच सुखबीर सिंग बादल यांना अखाल तख्तने(शीख धर्मातील सर्वोच्च समिती) धार्मिक शिक्षा सुनावली होती. २०१५ मध्ये तत्कालीन अकाली सरकारच्या काळात सरकारकडून झालेल्या चुकांची कबुली दिल्यानंतर




अखाल तख्तने सोमवारी बादल यांच्यासह तत्कालीन सरकारमधील मंत्र्यांना अमृतसरमधील सुवर्ण मंदिरातील शौचालय साफ करणे, लंगरमध्ये सेवा देणे आणि भांडी धुण्याची शिक्षा सुनावली होती. त्याच शिक्षेचा भाग म्हणून बादल हे सुवर्ण मंदिरात प्रवेशद्वारावर सेवा देत होते. त्यावेळी ही घटना घडली.

## विधानसभेची मोहीम फत्ते; आता काँग्रेसच्या अनेकांना भाजपाचे डोहाळे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४नांदेड :–** माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी भाजपात प्रवेश केल्यानंतरही त्यांचे समर्थक असलेल्या अनेकांनी काँग्रेसमध्येच राहणे पसंत केले होते. परंतु आता विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यात काँग्रेससह महाविकास आघाडीचा धुव्वा उडाल्याने काँग्रेसमधील अनेकांना स्थानिक स्वराज्य संस्थांची चिंता पडली आहे. त्यामुळे काही जणांनी भाजपाचे कमळ हाती धरण्याची तयारी केली आहे. तर काहीजण शिंदेसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करू शकतात. त्यामुळे विधानसभा निवडणुका



आटोपताच काँग्रेसला अनेक छोटे–मोठे धक्के बसण्यास सुरुवात झाली आहे. माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी मे महिन्यात झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर भाजपात प्रवेश केला होता. परंतु त्यावेळी चव्हाणांसोबत मोठे काही नेते वगळता आमदार, माजी आमदार, तसेच जिल्ह्यातील दिग्गज पदाधिकारी यांनी मात्र काँग्रेसमध्येच राहणे पसंत केले होते. त्यावेळी काँग्रेसमधील अनेकांना ते चव्हाणांची बी टीम असल्याचा संशय होता. परंतु त्यावेळच्या लोकसभा निवडणुकीत या मंडळींनी काँग्रेससाठी झोकून देत काम केले होते. त्यामुळे वसंतराव चव्हाण यांचा विजय झाला होता. त्यामुळे जिल्ह्यात काँग्रेसला नेतृत्व अन् बुस्टरही मिळाला होता. परिणामी काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनाही चांगलेच बळ मिळाले होते. या विजयाच्या भरवशावरच नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीतही बाजी मारता येईल, असा अंदाज वर्तविण्यात येत होता. त्यामुळे काँग्रेसमध्ये इनकमिंगही वाढली होती. परंतु विधानसभा निवडणुकीचा कौल आला अन् काँग्रेस जणांचा भ्रमनिरास झाला. काँग्रेससह महाविकास आघाडीच्या सर्वच उमेदवारांचा पराभव झाला. तर लोकसभा पोटनिवडणुकीत मात्र रवींद्र चव्हाण यांचा अल्प मतांनी विजय झाला. परंतु आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेता दुसऱ्या फळीतील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये मात्र चलबिचल सुरू झाली आहे. काही जणांनी भाजपात प्रवेशही केला आहे. तर अनेकजण पाइपमध्ये आहेत. येत्या काही दिवसात भाजपासह महायुती आघाडीत इनकमिंग वाढणार असल्याचे चित्र असून ही काँग्रेससाठी धोक्याची घंटा आहे.

### मोहीम फत्ते आता पक्षांतर

जिल्ह्यात काँग्रेसमध्ये असलेल्या अनेकांवर अशोकराव चव्हाण यांची बी टीम संबोधले जात होते. त्याबाबत चव्हाण यांनीही मिश्कीलपणे माझ्या सर्वच पक्षात ए. बी. सी. टीम आहेत, अशी टिप्पणी केली होती. आता विधानसभा निवडणुका आटोपताच काँग्रेसमधील अशोकराव समर्थकांनी भाजपात प्रवेश करण्याची तयारी सुरू केली आहे.

## मैफिल स्वरांची या संगीत रजनीने उदघाटन सोहळ्याला केले रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध

### विदर्भाच्या पुरातन राजधानीचा नामक यात्रा महोत्सवामध्ये रंगारंग कार्यक्रम सादर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४कौंडण्यपूर–**

कौंडण्यपूर यात्रेमध्ये तीन दिवस विविध रंगारंग कार्यक्रमाने संपन्न झालेल्या महोत्सव विदर्भाचा..... विदर्भाच्या पुरातन राजधानीचा नामक ''अंबा रुख्मिणी महोत्सव २०२४'' चा उदघाटन समारंभ दिनांक २९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७. ०० वाजता मोठ्या जल्लोषात संपन्न झाला. या महोत्सवाचे उदघाटन रविराज देशमुख (प्रदेश उपाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी) यांच्याहस्ते संपन्न झाले. यावेळी व्यासपीठावर श्री सुधीरजी दिवे (माजी उपजिल्हाधिकारी व सल्लागार मा. केंद्रीय मंत्री जलसंपदा, नदी विकास व गंगा पुनरुज्जीवन), सौ. शिल्पाताई हांडे (मा. सभापती, पं. स. तिवसा), डॉ. मयूर कळसे (तहसिलदार तिवसा), सौ. गायत्रीताई देशमुख (कोषाध्यक्ष, महाराष्ट्र ग्राम दर्पण), सौ. वर्षाताई गाडगे (महिला जिल्हाध्यक्ष, ओबीसी मोर्चा अमरावती), प्रेमदास राठोड, (सरपंच, गट ग्रामपंचायत कौंडण्यपूर), तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गजाननरावजी बांबल, श्री अंबा रुक्मिनी सांस्कृतिक महोत्सव समितीचे दिनेशराव ठाकरे, अंकुशराव देऊळकर (उत्सव समिती अध्यक्ष), अमोल पुंडेकर (अध्यक्ष, श्री रुख्मिणी सहकार्य युवक मित्र मंडळ) श्री अमोलराव शेंडे, श्री संतोषराव मठिये (मारडा), श्री संतोषराव साठवणे (जहागीरपूर), अतुल ठाकरे (श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर विश्वस्त), श्रीरामजी केवदे (मा. उपसरपंच), बाळूभाऊ ठाकरे, दिलीपराव मेहकर, आशिष डुबे आदींची उपस्थिती होती.

नयनरम्य बोटिंग स्पर्धेनंतर संपन्न झालेल्या या उदघाटन सोहळ्याच्या प्रास्ताविकातून अक्षय पुंडेकर यांनी अंबा रुख्मिणी




महोत्सव २०२४ ची रूपरेषा मांडली.

गेल्या ४ वर्षाचा कार्यकाळ आणि विविध रंगारंग कार्यक्रम आयोजित करून या महोत्सवाने कौंडण्यपूरच्या कार्तिक यात्रेमध्ये विशेष भर घातली. आणि आता दिवसेंदिवस यात्रेचे स्वरूप वाढत असून पुढील काळात हा महोत्सव आणखी मोठमोठ्या कार्यक्रमांचे आयोजन करणार असल्याचे प्रतिपादन अक्षय पुंडेकर यांनी आपल्या प्रास्ताविकातून व्यक्त केले. तर कार्यक्रमाचे संचालन प्रा. रंजनसेन शेंडे व सौ. अश्विनी विलायतकर यांनी केले.

तीन दिवस विविध कार्यक्रम या महोत्सवामध्ये संपन्न झाले असून यात्रा परिसरात एकच जल्लोष झाला होता. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रतीक कदम, आकाश ठाकरे, रोशन भगत, निखिल ठाकरे, प्रयास भाकरे, वेदांत वानखडे, वैभव हेटे, हर्षल खंडारे, आकाश गायकवाड, स्वप्नील खेडकर, चंदूभाऊ ठाकरे, गोपी वेरूळकर , शाम नरखेडकर, उमेश श्रीखंडे, गोपालराव राठोड, सचिन इंगळे, प्रतीक सावळे, चित्राताई बरगट, सतीश निमकर, प्रमोद सपकाळ, प्रशांत कडू, अर्पित डुबे, दिपकराव जुमडे, बाळूभाऊ ठाकरे, दक्ष खंडारे, मानव गोरडे यांच्यासह श्री अंबा रुक्मिणी महोत्सव समितीचे सर्व सभासद, गावकरी व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मैफिल स्वरांची या संगीत रजनीने रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध

मैफिल स्वरांची या संगीत रजनीने उदघाटन सोहळ्यामध्ये एकच रंगत आणली. या मैफिलीला सुप्रसिद्ध गायक राहुल तायडे यांनी आपल्या सुमधुर आवाजाने रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. तसेच सुप्रसिद्ध गायिका दीपालीताई पांडे यांनी सुद्धा आपल्या संगीतमय शैलीतून रसिक प्रेक्षकांची मने जिंकली. यावेळी स्वागताध्यक्ष रविराज देशमुख यांनी प्रेक्षक म्हणून संपूर्ण संगीत रजनीचा आनंद घेतला.

## काँग्रेसच्या आकडेवारीशी आयोगाची असहमती

### सर्व प्रश्नांची उत्तरे काँग्रेसला लेखी पाठवणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**नवी दिल्ली :–** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर काँग्रेस सातत्याने निवडणूक आयोग आणि ईव्हीएमवर प्रश्न उपस्थित करत आहे. काँग्रेसच्या एका शिष्टमंडळाने मंगळवारी निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. राज्यसभा खासदार आणि ज्येष्ठ विधिज्ञ अभिषेक मनु सिंघवी, काँग्रेसचे सरचिटणीस मुकुल वासनिक, मीडिया विभागाचे प्रमुख पवन खेडा, महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा या शिष्टमंडळात समावेश होता. काँग्रेसने सादर केलेली आकडेवारी स्वीकारण्यास निवडणूक आयोगाने नकार दिला. तुमच्या सर्व प्रश्नांची उत्तरे आम्ही लेखी पाठवू, असेही निवडणूक आयोगाने स्पष्ट केले.

निवडणूक आयोग आता या सर्व प्रश्नांची उत्तरे काँग्रेस पक्षाला लेखी पाठवणार आहे. परंतु निवडणूक आयोगाने काँग्रेस पक्षाची आकडेवारी स्वीकारण्यास स्पष्ट नकार दिला.आयोगासमोर म्हणणे मांडल्यानंतर सिंघवी यांनी पत्रकारांना सांगितले की, आम्ही



आमचे मत तपशीलवार मांडले आहे. गंभीर मुद्द्यांवर डेटा प्रसिद्ध करायला हवा होता. लाखो लोकांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. याबाबत सविस्तर माहिती आम्ही मागितली आहे. जेणेकरून नावे का व कशी काढली गेली हे कळू शकेल.

**काँग्रेसचे सवाल**

काँग्रेसच्या शिष्टमंडळाने निवडणूक आयोगाला विचारले की, मतदार यादीत मोठी घसरण झाली आहे. विधानसभेच्या दृष्टीने ही आकडेवारी द्या आणि याचे कारण काय आहे? गेल्या पाच महिन्यांत ४७ लाख नवीन मतदार कसे जोडले गेले, असा सवालही काँग्रेसने केला. पाच वाजल्यानंतर सात टक्के अधिक मतदान कसे होऊ शकते? असा सवालही शिष्टमंडळाने केला.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त काँग्रेस पक्षाच्या वतीने अभिवादन रॅली चे आयोजनक

### कर्नाटक चे सर्वात तरुण आमदार प्रदीप ईश्वर मुख्य अतिथी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती**...नया अकोला येथील श्रध्दा भूमी वरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी स्मारक येथे गत दोन वर्ष पासून आयोजित अभिवादन सभे प्रमाणे या वर्षी ही अभिवादन यात्रा आणि सभेचे आयोजन करण्यात आले आहे.या वर्षीच्या अभिवादन समारोहाला कर्नाटक चे सर्वात युवा आमदार प्रदीप ईश्वर हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेमहा परिनिवार्न दिनानिमित्त ड.यशोमती ताई ठाकूर यांच्या नेतृत्वात जिल्हा काँग्रेस कमिटी च्या वतीने दि. ६ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ९.००



वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातील (इरविन चौक) डा.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला वंदन करून नया अकोला कडे अभिवादन यात्रा मार्गस्थ होईल.या अभिवादन यात्रेला जिल्हा काँग्रेस कमिटी ग्रामीण शहर ,महिला आघाडी,युवक काँग्रेस,अनुसूचित जाती विभाग,ओबीसी विभाग,अल्पसंख्याक विभाग,सेवा दल आणि सर्व विभागांचे चे नेते ,पदाधिकारी,कार्यकर्ते सहभागी होतील.या अभिवादन बाईक आणि कार यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा आणि शहर काँग्रेस च्या वतीने करण्यात आले आहे.

## अमरावती विद्यापीठात अधिष्ठाता पदभरतीतून आरक्षणाचा ‘बिंदू’ गायब, अखेर ’ती’ जाहिरात रद्द

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती–**

आरक्षणावरून राजकीय व सामाजिक क्षेत्रात घमासान सुरु असताना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने अधिष्ठाता पदभरतीतून आरक्षणाचा ‘बिंदू’ गायब केल्याचा धक्कादायक प्रकार मंगळवारी सिनेट सभेत उघडकीस आला आहे.

विद्यापीठातील दोन अधिष्ठाता पदभरतीत खुला व ओबीसी संवर्गासाठी आरक्षण निश्चित करताना त्याचा केंद्रबिंदू ठरविण्यात आला नसल्याचा आरोप सदस्यांनी पुराव्यांनिशी केला.

या मुद्यावरून चांगलेच घमासान झाल्यानंतर विद्यापीठाने प्रसिद्ध केलेली पदभरतीची जाहिरात अखेर रद्द केली असून नव्याने पदभरती होणार आहे.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने ९ सप्टेंबर २०२४ रोजी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा आणि मानव विज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता पदासाठी आरक्षण निर्धारण करून जाहिरात प्रकाशित केली होती. परंतु आरक्षण निश्चित करताना विद्याशाखेच्या कोणत्या संवर्गासाठी आरक्षण निश्चित करण्यात आले ही बाब स्पष्ट करण्यात आली नव्हती. खुला व ओबीसी संवर्गासाठी पदे असल्याचे स्पष्ट असले तरी यामुळे एससी संवर्गावर अन्याय झाल्याचा मुद्दा मंगळवारी विद्यापीठाच्या अधिसभेत उघडकीस आणला. सिनेट सदस्य डॉ. सुभाष गवई यांनी प्रश्नोत्तराच्या तासात ‘पॉईट ऑफ ऑर्डर’द्वारा ही बाब सभागृहापुढे मांडली.

विद्यापीठाने अधिष्ठातापदासाठी अर्ज मागविले



आहेत परंतु कोणत्या विद्याशाखेसाठी कोणत्या संवर्गातील उमेदवाराने अर्ज करायचे याची गल्लत झाली आहे. अधिष्ठाता पूर्णवेळ अधिकारी असून त्याजागी शिक्षक कार्य करू शकत नाही. आरक्षणाचा बिंदू केंद्रीत नाही. कोणत्या पदासाठी कोणते आरक्षण ही बाब पुरेशी स्पष्ट नाही. त्यामुळे विज्ञान शाखेतील पारंगत उमेदवाराने नेमका मानव विज्ञान शाखेसाठी अर्ज करायचा का? असा प्रश्न डॉ. सुभाष गवई यांनी केला. उमेदवार संभ्रमित असून अनेकजण आरक्षणात बसत असतानाही त्यांनी अर्ज केले नसल्याची बाब त्यांनी मांडली.

यासाठी चार सदस्यीय समिती गठीत करून संपूर्ण प्रकरणाची चौकशी करावी, अशी बाजू त्यांनी मांडली. यावेळी डॉ. संतोष बनसोड यांनी या संपूर्ण प्रकरणात एससी संवर्गाचे आरक्षण पुढे आले नसल्याचे म्हटले. हा संपूर्ण प्रकार गंभीर असल्याने याप्रकरणाची चौकशी करावी, अशी मागणी डॉ. सुभाष गवई यांनी केली.

डॉ. गवई यांनी यावेळी चार सदस्यीय समिती गठीत करण्याची सूचना केली. पीठासीन सभापती व कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते यांनी शासनाच्या निर्णयांनुसार पदभरतीसाठी जाहिरात प्रकाशित केल्याचे सांगितले. परंतु पदभरती बाबत संभ्रम व सदोष नसल्याने नव्याने जाहिरात प्रकाशित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय याप्रकरणाची चौकशी करण्यासाठी सिनेट सदस्य डॉ. प्रवीण रघुवंशी यांच्या अध्यक्षतेत समिती गठीत करण्याचे त्यांनी जाहीर केले.

# काश्मिरी, पश्मिना, राजस्थानी शालींना पसंती

## अडीचशे ते नऊशे रुपयांपर्यंत किंमत; खरेदीसाठी महिलांची बाजारात गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

थंडी पडायला सुरुवात होताच उबदार कपड्यांच्या दुकानांवर तरुणांसह महिला, पुरुषांची स्वेटर, कानटोप्या, हातमोज्यांसह शाल खरेदीसाठी गर्दी वाढली आहे. सध्या ढगाळ वातावरण असले तरी त्यानंतर मात्र थंडी वाढणार आहे. त्यामुळे साडी, ड्रेस, जीन्सवर शाही लूक येण्यासाठी यंदा शहरात तरुणींसह महिलांकडून शालींना मागणी होत आहे. यात पश्मिना, काश्मिरी, कुल्लू, राजस्थानी, कलमकारी, काठमांडू, पॉली वुलन, रेक्झीन, प्रिंट शालीला पसंती मिळत आहे. २५० रुपयांपासून ते ९०० रुपयांपर्यंत शाल बाजारात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.



शहरातील दसरा मैदान, अंबादेवी- एकवीरा देवी परिसर, बापट चौक, मोची गल्ली, श्याम चौक, जवाहर गेट, इतवारा परिसरात उबदार कपड्यांची दुकाने थाटली आहेत. ९ डिसेंबरपासून शहरात कडाक्याची थंडी पडणार आहे. यामुळे आतापासूनच अमरावतीकर स्वेटर खरेदी करताना दिसून येत आहेत. मंगळवारी श्याम चौक परिसरात तिबेटियन विक्रेत्यांकडे ग्राहकांची गर्दी वाढली होती. दरम्यान, बाजारात वजनाने हलकी आणि उबदार पॉली वूलन शालीला पसंती होती. शिवाय, महिलांसह तरुणींकडून रॉयल लूकसाठी राजस्थानी आणि पश्मिना, काश्मिरी शालीला पसंती मिळत होती. सुमारे ४५० ते ९०० रुपयांना या शाल उपलब्ध आहेत.

हँड प्रिंट, ब्लॉक प्रिंट डिझाइनला पसंती उबदार कपड्यांच्या बाजारात पॉली वूलन शाल, रेक्झीन शाल, प्रिंट शाल, जॉल शाल, प्लेन, अँक्रा शालसह प्युअर वूलन शाल विविध डिझाइनमध्ये उपलब्ध झालेल्या आहेत. लोकरीपासून तयार केलेली कुल्लूची पट्ट शालही बाजारात विक्रीला आहे. हँड प्रिंट, ब्लॉक प्रिंट डिझाइन्स केलेल्या कलमकारी शालचेही आकर्षण वाढले आहे. ही शाल साडी, ड्रेस, जीन्सवर अधिक शोभून दिसते. तिबेट, काठमांडू, जगदंबा शाल ३३० ते ८५० रुपयांपर्यंत बाजारात उपलब्ध आहे.

# चार्जिंग स्टेशनचा केवळ पाया तयार

## काम संथगतीने काम पूर्ण होण्यास लागणार एक महिना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

तपोवन येथील एसटीच्या कार्यशाळेतील चार्जिंग स्टेशनचे काम संथगतीने सुरू असल्यामुळे ते पूर्ण होण्यास आणखी एक महिना लागणार आहे. त्यामुळे आता अमरावती विभागात इलेक्ट्रिक एसटी बस नव्या वर्षातच धावणार आहेत.

हैदराबाद येथील कंपनीकडे हे चार्जिंग स्टेशन बनवण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. अमरावती येथील चार्जिंग स्टेशनचे काम रखडल्यामुळे इतर सहा डेपोंवरील कामही रेंगाळले आहे. हे काम पूर्ण होण्यासाठी आणखी वेळ असून चार्जिंगसाठी लागणारे साहित्य, पॉइंट्स, प्रशासकीय कार्यालय तसेच इतर काही व्यवस्थांचे निर्माण पूर्ण व्हायचे आहे ते बघता कामाचा वेग वाढवला तरी येथील काम किमान एक महिना तरी पूर्ण होणार नाही. त्यामुळे अमरावती एसटी विभागात इलेक्ट्रिक बेल धावण्यासाठी नवे वर्ष अर्थात २०२५ उजाडणार आहे. मागील सात महिन्यांपासून चार्जिंग स्टेशन उभारण्याचे काम सुरू असून, अद्यापही ते पूर्ण झाले नाही. यात कंत्राट घेणाऱ्या कंपनीच्या उदासीनतेसह पाऊस मुख्य अडथळा ठरला आहे. त्यामुळे अमरावती विभागातील प्रवासी एसटीच्या इलेक्ट्रिक बसमधून प्रवास करण्यापासून वंचित राहिले आहेत.



### चार्जिंग स्टेशनचा पाया तयार

चार्जिंग स्टेशनचा केवळ पाया तयार झाला असून, अन्य इतर आवश्यक सुविधांची उभारणी व्हायची आहे. त्यामुळे अजूनही किमान एक महिना काम पूर्ण होणार नाही, असे प्रथमदर्शनी वाटत आहे. काम पूर्ण झाल्यानंतरच इलेक्ट्रिक बस मागवल्या जाणार आहेत.

**–नीलेश बेलसरे, विभागीय नियंत्रक, अमरावती एसटी विभाग.**

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त अनारक्षित विशेष गाडी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ बडनेरा**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबई येथे जाणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी मध्य रेल्वेने अमरावती ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसपर्यंत अनारक्षित विशेष गाडी चालवण्याचा निर्णय घेतला आहे.

अमरावती – मुंबई अनारक्षित (एक फेरी) विशेष गाडी क्रमांक ०१२१८ ही ५ डिसेंबर रोजी अमरावती येथून सायंकाळी ५:४५ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (मुंबई) येथे दुसऱ्या दिवशी पहाटे ५.२५ वाजता पोहोचेल. विशेष



गाडी क्रमांक ०१२१७ ही ७ डिसेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून रात्री १२:४० वाजता सुटेल आणि अमरावती येथे त्याच दिवशी दुपारी १२:५० वाजता पोहोचेल. बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, नांदुरा, मलकापूर, भुसावळ, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, मनमाड, नाशिक रोड, इगतपुरी, कल्याण, दादर आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (मुंबई) असे थांबे निश्चित केले आहेत. गाडीच्या संरचनेमध्ये १४ सामान्य, द्वितीय श्रेणीचे डबे राहतील. महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबईच्या चैत्यभूमीला जाणाऱ्या प्रवाशांनी या विशेष गाड्यांची नोंद घ्यावी, प्रवाशांनी वैध तिकीट घेऊन प्रवास करण्याचे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# लग्नकार्य सामान्य नागरिकांचे, आहेर मिळतो शासनाला

## समारंभांच्या खर्चात वाढ : फेट्यापासून नवरीच्या मेकअपपर्यंत जीएसटी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ अमरावती**

तुळशीविवाहानंतर लग्नसराई हंगाम जोमात सुरू झाला आहे. वधु- वरांकडील मंडळी हौसेसाठी लाखोंचा चुराडा करीत आहेत. 'कृपया भेटवस्तू किंवा आहेर आणू नये', 'आपली उपस्थिती हाच आहेर, अशी टीप सुद्धा अनेक लग्नपत्रिकेत हमखास असते. असे असले तरी जवळचे नातेवाईक व मित्रपरिवारांकडून आहेर, भेटवस्तू दिल्या जातातच. परंतु जेवणाच्या घासापासून सर्वच सेवांसाठी भरावा लागणारा जीएसटी या आहेरापेक्षा कितीतरी जास्त पटीने शासनाकडे जमा होत आहे. लग्नासह सर्वच



समारंभाच्या खर्चात वाढ झाली आहे. लग्नकार्य घरचे असले तरी खरा आहेर मात्र शासनालाच मिळत असल्याची सध्याची स्थिती आहे.

लग्नकार्य प्रत्येकाच्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण. हा दिवस अविस्मरणीय करण्यासाठी प्रत्येक वर-वधू पक्षाचा कल असतो, थाटात लग्नकार्य करण्यासाठी प्रसंगी कर्ज काढून खर्च करण्याची तयारीदेखील केली जाते. मध्यमवर्गातील एका लग्नसोहळ्यासाठी साधारणपणे पाच ते दहा लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असतो. या खर्चाची सुरुवात लग्नाचे कपडे खरेदीपासून सुरू होतो. कपडे खरेदी करताना कर लागतो. त्यानंतरच्या प्रत्येक खर्चावर कर भरावा लागतो, निमंत्रण पत्रिका, कार्यालय ते जेवणापर्यंत सर्वच गोष्टींना आता कर भरावा लागतो. काही ठिकाणी बिल एकत्रित करून जीएसटी दाखविली जात नाही. मात्र वधु-वरांच्या खिशातून तो वसूल केलाच जातो. किराणा, गॅस, केटरर्स, प्रवास, लग्नाआधी तसेच लग्नकार्यात पुरवल्या जाणाऱ्या विविध सेवा, विविध विधींचा मेकअप, डेकोरेशन आदींचा खर्च भरमसाठ आहे.कार्यक्रमाला येण्याच्या आहेरापेक्षा शासनाला मिळणार जीएसटीचा आकडा तुलनेने मोठा होत आहे.

**नोंदणी पद्धतीने लग्न, त्यानंतर रिसेप्शन**


वायफळ खर्चाला फाटा देत काही जण नोंदणी पद्धतीने विवाहाला प्राधान्य देत आहे. मात्र त्यानंतर काही जण पाहुण्यांसाठी रिसेप्शन देतात. यामध्ये मोठ्या प्रमाणात खर्च होतो. लग्नातील हौस पूर्ण करण्यासाठी रिसेप्शनचा उत्तम पर्याय आहे. रिसेप्शनसाठी कमीत कमी दोन लाखांपासून पुढे खर्च केला जात आहे. त्यासाठी अनेक सेवांवर जीएसटी भरावा लागतो. मात्र बहुतांश ठिकाणी एकत्रित पैसे वसूल केले जाते.

**जीएसटी टाळण्यासाठी पक्के बिल नाही**

लग्नकार्य करताना मंगल कार्यालय, डेकोरेशन, केटरर्स तसेच अन्य सेवा घेताना बहुतांश जण जीएसटी टाळण्यासाठी पक्के बिल देत नाही. मात्र वधू-वरांच्या पालकांकडून जीएसटीच्या नावाने अतिरिक्त पैसे उकळले जात असल्याचेही अनेकांचे म्हणणे आहे.

# मृत शेळीवर विष टाकून वाघाची शिकार; आतापर्यंत ६ जणांना अटक

## वाघाच्या मिशीसह आणखी १४ नखांचा शोध सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अंजनसिंगी**

अंजनगाव वनपरिक्षेत्रात २५ नोव्हेंबरला वाघ मृतावस्थेत आढळला होता. त्याचा मृत्यू विषप्रयोगातून झाल्याचे समोर आले आहे. शिकारीसाठी शिकाऱ्यांनी मृत शेळीवर विष टाकले. ही शेळी वाघाने खाल्ल्याने त्याचा विषबाधेतून मृत्यू झाला असावा, असे प्रथमदर्शनी वन विभागाच्या तपासातून समोर आले आहे.

या प्रकरणात वन विभागाच्या पथकाने आतापर्यंत सहा जणांना अटक केली असून, मंगळवारी (३ डिसेंबर) रात्री सातव्या आरोपीला संशयाच्या आधारे चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. आतापर्यंत अटक केलेल्या आरोपींकडून चार नखे जप्त केली आहेत. मात्र वाघाची १२ नखे, मिशी व अन्य काही अवयव गायब होते. वन विभाग शोध घेत आहे. वाघाला समोर १० व मागे ८ असे एकूण १८ नखे असतात. शिकार झालेल्या वाघाच्या मृतदेहाजवळ दोन नखे होती. तसेच चार नखे शिकाऱ्यांकडून जप्त केली.

### शिकारी टोळी संबंधाबाबतही तपास, शवविच्छेदनाची प्रतिक्षा

वाघाची शिकार प्रकरणात सातव्याला चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. आतापर्यंतच्या तपासात या शिकाऱ्यांचा संबंध परराज्यातील शिकारी टोळीसोबत आढळून आलेला नाही. त्याबाबत तपास सुरू आहे. तसेच मृत शेळीवर विष टाकून वाघाला खाण्यासाठी ठेवली. शेळी खाल्ल्यामुळे वाघाचा मृत्यू झाला असावा, असा प्राथ. अंदाज आहे. मात्र शवविच्छेदन अहवालाअंती नेमके कारण समोर येईल.

**–अग्रीम सैनी, डीसीएफ, मेळघाट प्रादेशिक वन विभाग.**

# अतिक्रमण विभाग अंतर्गत अतिक्रमण निर्मूलनाची कार्यवाही




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

मा.आयुक्त व मा.उपायुक्त प्रशासन यांच्या आदेशाने मंगलवार दिनांक ०३/१२/२०२४ रोजी अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे निरीक्षक अन्सार अहमद यांच्या मार्गदर्शनाखाली श्याम चौक, जोशी मार्केट, गांधी चौक, चौधरी चौक, इतवारा बाजार, नागपुरी गेट, जमील कॉलनी, धर्म काटा, वलगाव रोड येथे साहित्य जप्तीची कारवाई करण्यात आली ३ ट्रक साहित्य जप्तीची अतिक्रमण निर्मूलनाची कार्यवाही करण्यात आली. सदर ठिकाणी रोडच्या दोन्ही बाजूंनी अतिक्रमण निर्मूलनाची कार्यवाही करण्यात आली. तसेच अतिक्रमणधारकांना सूचना देण्यात आल्या वाहतुकीला अडथळा निर्माण झाल्यास दैनंदिन कारवाई सुरू राहणार सदर कार्यवाहीत अतिक्रमण विभागाचे कर्मचारी व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# यंदा दोन लाख भीमसैनिक देणार मानवंदना : मोरे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती**

भीमा कोरेगाव येथील शूरवीरांना मानवंदना देण्यासाठी १ जानेवारी रोजी दोन लाख भीमसैनिक उपस्थित राहणार आहेत. या वेळी भीमा कोरेगाव युद्धाचे सरसेनापती सिद्धनाथ महाराचे बारावे वंशज मिलिंद इनामदार यांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे.

२ जानेवारीला समाजभूषण पुरस्कार वितरण सोहळा, ३ जानेवारीला सावित्रीबाई फुले जयंती सोहळा, प्रबोधनकार अनिरुद्ध वनकर, राज्यभरातील महागायक चंद्रकांत दादा, प्रल्हाद शिंदे, अजय देहाडे, अमोल घोडके, गीत बागडे, प्रतीक सोरसे, प्रबुद्ध जाधव, विश्वजा जाधव यांचा महासंग्राम व प्रबोधनात्मक संगीतमय कार्यक्रम आयोजित केल्याची माहिती मुख्य आयोजक कैलास मोरे यांनी दिली.

# एच.आय.व्ही.च्या भव्य रॅली ने वेधले अमरावतीकर जनतेचे लक्ष्य

## युवकांच्या सहभागाने एच आय व्ही कमी करण्यास होईल मदत : जिल्हाधिकारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

जागतिक एच आय व्ही पंधरवडा साजरा केल्या जातं आहे त्याच कार्यक्रमाचा एक भाग म्हणून आज दि ४ डिसेम्बर रोजी भव्य अश्या रॅली चे आयोजन करण्यात आले होते आज ची रॅली ऐतहासिक असल्याचे दरवर्षी रॅली मध्ये सहभागी होणाऱ्या सामाजिक संस्था च्या प्रतिनिधीचे मत होते. सकाळी जिल्हासामान्य येथे सदर रॅली ची सुरुवात जिल्हाधिकारी मा. सौरभ कटियार सर यांच्या उपस्थिती मध्ये हिरवी झेंडी दाखवून करण्यात आली तत्पूर्वी मा. जिल्हाधिकारी यांनी रॅली साठी उपस्थित सर्व सहभागी तसेच आयोजक यांचे एवढ्या मोठ्या प्रमाणात सहभाग घेण्या बद्दल अभिनंदन केले या वेळी आपल्या मार्गदर्शन पर भाषणात बोलताना मा. जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील एच आय व्ही संक्रमाणाचा टक्का कमी होत असल्याबद्दल कौतुक केले व युवकांनी जनजागृती मध्ये सहभाग नोंदवून अजून सहकार्य करण्याचे आवाहन केले. या वेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ दिलीप सौंदळे, वैध्यकीय अधिक्षक जिल्हा स्त्री रुग्णालय डॉ विनोद पवार, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ प्रदीप निरवाने, बाह्य संपर्क निवासी वैध्यकीय अधिकारी डॉ संदीप हेडाऊ, वरिष्ठ स्त्री रोग तज्ञ डॉ पुष्पा सोमवंशी,



वरिष्ठ बालरोग तज्ञ् डॉ संदीप दानखडे, डॉ सोनाली शिरभाते, निमा चे डॉ अमोल ठवळी, जिल्हा सामान्य रुग्णालयच्या मेट्रोन श्रीमती ललिता अटाळकर, जिल्हा कार्यक्रम अधिकारी अजय साखरे, डॉ रघुनाथ वाडेकर, श्री बळीराम रामटेके.अमरावती जिल्ह्यामध्ये वैध्यकीय खाजगी महाविद्यालयात, जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय, जिल्हा क्षय रुग्णालय, संदर्भ सेवा रुग्णालय सोबतच ५ उपजिल्हा रुग्णालय, ९ ग्रामीण रुग्णालय, ६० प्राथमिक आरोग्य केंद्र, ७० खाजगी रुग्णालय, २ लैंगिक आजार समुपदेशन व उपचार केंद्र, शासकीय रक्तपेढी, ४ खाजगी रक्तपेढी तसेच सरकार मान्य एच आई व्ही साठी कार्यरत सामाजिक संस्था, अमरावती शहरातील महाविद्यालय, विविध क्लब, विविध संघटना यांच्या मध्ये एच आई व्ही ची जनजागृती करण्याच्या उदधेशाने भव्य जनजागृती रॅली चे आयोजन करण्यात आले होते सदर रॅली मध्ये शहरातील महाविद्यालय यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला या रॅली मध्ये २५०० विध्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून कवत जनजागृती व देशभक्तीपर घोषणा दिल्या. रॅली ची सुरुवात जिल्हा सामान्य रुग्णालय मधून करण्यात आली आणि रेल्वे स्टेशन, राजकमल, श्याम चौक, जयस्तंभ चौक, कॉटन मार्केट चौक, इर्विन चौक येथे मार्गस्थ होऊन जिल्हा सामान्य रुग्णालय येथे मा. अतिरिक्त जिल्हा शल्य डॉ. प्रदीप निरवणे, अजय साखरे यांच्या उपस्थितिथी मध्ये समारोप करण्यात आला.या वेळी विशेष घटकातील लाभार्थिंनी काढलेल्या रांगोळी चे सर्व मान्यवर यांनी कौतुक केले.

# भाजपा कार्यकर्त्यांचा जल्लोष !देवेंद्र फडणवीस यांची एकमताने भाजप विधिमंडळ पक्षाच्या गटनेतेपदी निवड....



देवेंद्र फडणवीस यांची गटनेतापदी निवड झाल्यानंतर पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी जल्लोष साजरा केला यावेळी भाजप कार्यकर्त्यांनी फटाक्यांची जोरदार आतिषबाजी केली. ढोल ताशांच्या गजरात भाजप कार्यकर्त्यांनी साजरा केला आनंदोत्सव. देवा भाऊ तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है कार्यकर्त्यांनी दिल्या घोषणा. लाडक्या बहिणींच्या आशिर्वादामुळेच देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री. महिला कार्यकर्त्यांनी देखील केला जल्लोष साजरा केला. फडणवीस पुन्हा एकदा मुख्यमंत्री पदी विराजमान होत असल्याने लाडू वाटून आनंद हि यावेळी व्यक्त करण्यात आला.

भाजप प्रदेश सचिव जयंत डेहनकर प्रवक्ते शिवराय कुलकर्णी, जिल्हा महामंत्री चेतन पवार, सुरेखा लुंगारे, राजेंद्र मेटे, मंडल अध्यक्ष छोटू वानखेडे, श्रीकांत धानोरकर, मनीष चौबे,, लखन राज, कौशिक अग्रवाल, निलेश काजे, प्रवीण वैश्य, निता राऊत, कुसुमताई शाहू, नवीन हर्षे वंदना मडगे, रिता ताई मोकलकर, लक्ष्मी नावंदर, अलका सरदार, शितल वाघमारे, सतनाम कौर हूडा, रोशनी वाकडे, संगीता तोंडे, रेखा माहोरे, मेघा हिंगास्पुरे, ज्योतीताई वैद्य, सुरेखा ठाकरे, तृप्ती वाट, स्मिता देशमुख, अर्चना पुंड, मीना पवार, हेमंत श्रीवास्तव, सुधीर थोरात, शेखर माळवदे अखिलेश खेडेकर, शैलेंद्र मिश्रा अभिषेक राठोड, मोहनलाल मंदाणे, सुभाष समदेकर, देशपांडे,सह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## जमीन मोजणीचा दर झाला दामदुप्पट, सर्वसामान्यांना फटका

### मोजणीसाठी आता केवळ दोनच प्रकार, आधी होते चार प्रकार



अरुण जोशी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.४अमरावती

राज्य शासनाचा कारभार खऱ्या अर्थाने सुरू व्हायचा असला तरी जमीन मोजणीसाठी शेतकऱ्यांसह नागरिकांना चांगलाच दणका दिला आहे. २ डिसेंबरपासून प्रक्रिया सुलभ अन् सुटसुटीत केली असली तरी मोजणीचे दर दामदुप्पट केल्याने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडणारा निर्णय ठरला आहे.

जमीन मोजणीच्या चार प्रकारांऐवजी आता फक्त दोन प्रकार ठेवण्यात आले आहेत. तसे आदेश विधानसभा निवडणुकीपूर्वी १० ऑक्टोबरला शासनाने काढले होते. प्रत्यक्षात या आदेशाची अंमलबजावणी२ डिसेंबरपासून सुरू झाली आहे. यापूर्वी नियमित, तातडीची, अति तातडीची व अति अति तातडीचे असे प्रकार होते. यामध्ये प्रकारानुसार दर कित्येक पटीच्या घरात जात होते. यामध्ये आता सुलभता आणून नियमित व द्रुतगती असे दोन प्रकार करण्यात आले आहेत. नियमित मोजणीसाठी अर्ज केल्यापासून ९० दिवसांचा कालावधी ग्राह्य धरण्यात येणार आहे, तर द्रुतगती मोजणीसाठी कमाल ३० दिवसांचा कालावधी असेल. मोजणीचे दर बदलले असते तरी १ डिसेंबरपूर्वी ज्यांनी अर्ज केले आहेत. त्यांना जुन्याच दराने आकारणी होणार आहे. ग्रामीण क्षेत्रातील नियमित मोजणीसाठी दोनहेक्टरपर्यंत एक हजार रुपये फी आकारणी होती. ती आता दोन हजार रुपये करण्यात आली आहे.

#### ई-मोजणी व्हर्जन-२ सिस्टीममध्ये अपलोड

ई मोजणीचे व्हर्जन-२ ॲप सिस्टीममध्ये अपलोड झालेले आहे. यामध्ये प्राप्त अर्ज व उपलब्ध मनुष्यबळ यानुसार मोजणीचे काम दिले जाणार आहे. ही सिस्टीम आता अपलोड झालेली आहे. त्यामुळे उपलब्ध मनुष्यबळात मोजणीचे नियोजन सिस्टीम करणार आहे. त्यामुळे उपलब्ध मनुष्यबळात जलद गतीने कामे होणार आहेत.

#### मनपा हद्दीत मोजणीचे दराचा फटका

महापालिका, नगरपालिका क्षेत्रात दोन हेक्टरपर्यंत नियमित मोजणीला २ हजार, तर द्रुतगतीला ८ हजार रुपये मोजणी फी भरावी लागेल. यानंतरच्या दोन हेक्टरसाठी १ हजार, द्रुतगतीसाठी ४ हजार रुपये शुल्क आहे. मंजूर रेखांक- नातील प्रत्येक भूखंडासाठी एक हेक्टर मयदित १,५०० रुपये व दूत-गतीसाठी सहा हजार राहणार आहे.

## फडणवीसांच्या नागपुरातील निवासस्थानापुढे जल्लोष

विदर्भ प्रजासत्ताक
दि.४नागपूर

भाजप गटनेते पदाची घोषणा होताच देवेंद्र फडणवीसांच्या नागपुरातील घरासमोर भाजप कार्यकर्त्यांकडून मोठा उत्सव साजरा केला. . देवाभाऊ आगेबढो च्या घोषणा देण्यात आल्या देवेंद्र फडणवीस यांचा नाव भाजपचे कोर कमिटीमध्ये मुख्यमंत्री पदासाठी निश्चित होताच नागपुरात त्यांच्या घरासमोर भाजपच्या युवा कार्यकर्त्यांनी जल्लोष सुरू केलाय. ढोल ताशाच्या निनादात कार्यकर्ते आपला आनंद व्यक्त करत आहेत. मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस हेच येतील असा आम्हाला विश्वास होता आणि आता हळूहळू एक एक टप्पा पार करून ती प्रक्रिया पार पडत असल्याचा आनंद असल्याचे मत कार्यकर्त्यांनी व्यक्त केले आहे.



मुख्यमंत्री, विरोधीपक्ष नेता आणि उपमुख्यमंत्री असे सर्व महत्वाचे पद भूषवलेले देवेंद्र फडणवीस पुन्हा एकदा मुख्यमंत्री झाले आहेत. नागपूर महापालिकेतील नगरसेवक, महापौर ते राज्याचे मुख्यमंत्री अशी त्यांची जाज्वल राजकीय कारकीर्द आहे. फडणवीस यांनी २०१४ ते २०१९ या दरम्यान पूर्ण पाच वर्षासाठी मुख्यमंत्रीपद भोगल्यानंतर २०१९मध्ये औटघटकेचे मुख्यमंत्रीपद वगळता ते पुन्हा तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले आहेत. नगरसेवक, महापौर, विरोधीपक्षनेते, उपमुख्यमंत्री आणि आता पुन्हा मुख्यमंत्री अशी त्यांची राजकीय कारकीर्द आहे. विशेष म्हणजे गेल्या पाच वर्षात त्यांनी मुख्यमंत्री, विरोधीपनेते, उपमुख्यमंत्री अशी तिन्ही महत्वाची पदे भूषविली होती.

फडणवीस यांच्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात भाजपशी संलग्न असलेल्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेपासून झाली. ते या संघटनेचे सक्रिय सदस्य होते. त्यांनी पहिल्यांदा नागपूर महापालिका निवडणूक राम नगर प्रभागातून जिंकली. १९९७ मध्ये फडणवीस नागपूर महापालिकेचे सर्वात तरुण महापौर बनले आणि ते भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे तरुण महापौर होते. त्यानंतर पहिल्यांदा १९९९ मध्ये ते पश्चिम नागपूर विधानसभेमधून निवडून आले. या मतदारसंघातून सलग दोनदा आमदार झाले. त्यानंतर ते दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदारसंघातून चारदा विजयी झाले. १९९९ पासून ते महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेत नागपूरचे प्रतिनिधित्व करत आहेत.२०१४ मध्ये ते पहिल्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांच्यानंतर ते महाराष्ट्राचे सर्वात तरुण मुख्यमंत्री ते ठरले. २३ नोव्हेंबर २०१९ रोजी फडणवीस यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजित पवार यांच्यासोबत सरकार स्थापन केले. पण काहीच दिवस टिकले.

उच्चविद्याविभूषित देवेंद्र फडणवीस यांचे शालेय शिक्षण भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या नावावर असलेल्या नागपुरातील इंदिरा कॉन्व्हेंटमधून झाले. त्यानंतर त्यांनी शंकरनगर येथील सरस्वती विद्यालयात आणि धरमपेठ कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतला. त्यांनी नागपूरच्या शासकीय विधी महाविद्यालयातून १९९२ मध्ये पदवी प्राप्त केली. त्यांनी व्यवसाय व्यवस्थापनात पदव्युत्तर पदवी आणि डीसीई, बर्लिनमधून प्रकल्प व्यवस्थापनाच्या पद्धती आणि तंत्रात पदविका प्राप्त केली आहे.

## नागपूरऐवजी राजस्थानी संत्रा वेधतोय ग्राहकांचे लक्ष; पुण्याच्या बाजारपेठेत दररोज १० ते १५ टन आवक

विदर्भ प्रजासत्ताक
दि.४पुणे

नागपूर आणि आंबट-गोड संत्रा हे समीकरणच आहे. त्यामुळे संत्रा म्हटले की, नागपूरचे नाव डोळ्यांसमोर येते. मात्र सद्य:स्थितीत राजस्थान येथून आलेली संत्री ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. त्यामुळे बाजारात नागपूरच्या संत्र्यांऐवजी राजस्थानच्या संत्र्याला अधिक मागणी होत असून, या संत्र्याला ग्राहकांची पसंती अधिक मिळत आहे. मार्केट यार्ड फळबाजारात १५ दिवसांपासून १० ते १५ टन राजस्थान संत्र्यांची आवक होत आहे. ही संत्री नागपूर संत्र्यांच्या तुलनेत आकाराने लहान आहेत. ती रंगाने नारंगी असून चवीला गोड आहे. त्यामुळे राजस्थान येथून आलेल्या संत्र्यांची रोजच्या रोज विक्री होत असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. राजस्थान येथून विक्रीसाठी आलेल्या संत्र्याला घाऊक बाजारात प्रतिकिलोला २० ते ५० रुपये भाव मिळत आहे. या संत्र्यांचा हंगाम डिसेंबरअखेर ते जानेवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत असतो. सध्या बाजारात राजस्थान संत्र्यांसह नागपूर, अमरावती येथून संत्र्यांची आवक होत आहे. बाजारात रोज ३० ते ५० टनांची आवक होत आहे. सद्य:स्थितीत संत्र्यांचा बहर सुरू आहे. हा बहर आणखी दीड महिना सुरू असणार आहे. अमरावतीचा संत्रा आकाराने मोठा आहे. या संत्र्याची साल जाड असून चव आंबट-गोड आहे.

## अशी आहे .. देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधी समारंभाची निमंत्रण पत्रिका

विदर्भ प्रजासत्ताक दि.४मुंबई

नव्या सरकार स्थापनेसाठी आज (४ डिसेंबर) मुंबईत राजकीय घडामोडींना चांगलाच वेग आला आहे. आज भाजपाची केंद्रीय निरीक्षकांच्या उपस्थितीत भाजपाची महत्त्वाची बैठक झाली. त्यानंतर



भाजपाच्या विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत आमदारांनी देवेंद्र फडणवीस यांची विधिमंडळ गटनेतेपदी एकमुखाने निवड केली. यानंतर आता राज्यपालांकडे महायुतीतर्फे सत्तास्थापनेचा दावा केला जाणार आहे. मात्र, अद्याप राज्यपालांकडे कोणत्याही पक्षाने / आघाडीने बहुमताचा दावा करण्यापूर्वीच फडणवीसांचा मुख्यमंत्री म्हणून उल्लेख असलेली आमंत्रण पत्रिका व्हायरल होत आहे.

## देवेंद्र फडणवीस विदर्भातील पाचवे, नागपुरातील दुसरे मुख्यमंत्री

विदर्भ प्रजासत्ताक
दि.४ नागपूर

नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत सर्वाधिक जागा (१३२) जिंकणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या विधिमंडळ नेतेपदी नागपूरकर देवेंद्र फडणवीस यांची निवड झाल्याने महायुतीचे नेते म्हणून तेच नवे मुख्यंत्री म्हणून गुरूवारी शपथ घेणार आहेत. ते विदर्भातील पाचवे व नागपूरचे दुसरे मुख्यमंत्री ठरतील.

नगरसेवक ते राज्याच्या सर्वोच्च स्थानी विराजमान होणारे देवेंद्र फडणवीस नागपूरकरांसाठी देवाभाऊ आहेत. महाराष्ट्राची स्थापना झाल्यावर राज्याचे पहिले मुख्यमंत्री होण्याचा मान दिवंगत यशवंतराव चव्हाण यांना मिळाला होता. त्यांनी दिल्लीत संरक्षणमंत्री म्हणून जाण्याचा निर्णय घेतल्यावर या पदाची सुत्रे वैदर्भीय वसंतराव नाईक यांच्याकडे सोपवली होती. ते विदर्भातील पहिले मुख्यमंत्री होते.नाईक तब्बल११ वर्ष राज्याचे मुख्यमंत्री होते १९६३ ते १९७५ या काळात त्यांनी. राज्यात हरित क्रांती घडवून आणली. त्यांच्या निधनानंतर वैदर्भीय मारोतराव कन्नमावर राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्यांचा कार्यकाळ् एक वर्षाचाच



होता. त्यानंतर राज्यात शरद पवार यांचे पर्व उदयास आले. त्यांनी या राज्याचे चार वेळा मुख्यमंत्रीपद भूषवले. त्याचा त्याग करून तेही यशवंतराव चव्हाण यांच्या प्रमाणेच दिल्लीत संरक्षणमंत्री म्हणून गेले. दिल्लीला जाताना त्यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी वैदर्भीय सुधाकरराव नाईक यांच्याकडे सोपवली होती नाईक एक वर्षाहून काही काळराज्याचे मुख्यमंत्री होते. त्यांचे पवार यांच्याशी मतभेद झाल्यावर त्यांना सत्ता सोडावी लागली व पुन्हा पवार राज्याचे मुख्यमंत्री झाले.वसंतराव नाईक यांच्यानंतर पूर्णवेळ पाच वर्ष मुख्यमंत्री म्हणून ज्या वैदर्भीय नेत्यांनी काम केले त्यात देवेंद्र फडणवीस यांचा समावेश आहे. २०१४ -२०१९ असे पाच वर्ष ते या राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यानंतर २०१९ मध्ये त्यांना पुन्हा मुख्यमंत्री होण्याची संधी मिळाली होती. पण शिवसेनेने ऐनवेळी मुख्यमंत्रीपदाची मागणी केली. त्यानंतर महाविकास आघाडीचा प्रयोग झाला. या सर्व प्रकार घडत असतानाही फडणवीस यांनी राष्ट्रवादीचे अजित पवार यांना सोबत घेऊन पहाटे शपथ घेतली. त्यावेळी ते दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले होते. पण पाचच दिवसात हे सरकार कोसळळे. त्यानंतर ते विरोधी पक्ष नेते म्हणून काम करू लागले. अडिच वर्षात त्यांनी महाविकास आघाडीचे सरकार पाडले. तेव्हा तेच मुख्यमंत्रीहोतील असा अंदाज होता. मात्र ऐनवेळी शिंदे मुख्यमंत्री झाले. २०२४ च्या निवडणुकात भाजपला दणदणीत यश मिळाले. त्यामुळे तेच मुख्यमंत्री होतील हे स्पष्ट होते. बुधवारी त्यावर शिक्कामोर्तब झाले.